

# श्री साईलीला

ॐ
५०

१९

स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईंतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २



# श्री साई वाक्सुधा

“ आपलें लक्ष नेहमीं साधुसंताच्या कथा ऐकण्याकडे लागून राहिलेलें असावें. मनांत कुविचारांना केव्हांहि जागा देऊं नये. नेहमीं सद्भावना मनांत बाळगाव्या. ज्यांनीं आपणांस जन्म दिला; त्या मातापित्याची अवज्ञा केव्हांहि करूं नये. तोच ज्ञानी कीं जो आपल्या आई वडिलाचा नेहमीं मान राखतो. सहस्र तीर्थें करून जें पुण्य लाभणार नाहीं तें आईची सेवा केल्यानें लाभणार आहे. मातेच्या ठायीं सर्व तीर्थें आहेत याची आपण खूण गांठ बांधून ठेवावी. त्याचप्रमाणें पिता हें घरच्याघरीं असणारें एक महान् दैवत आहे म्हणून समजावें. आपले बंधू, आपल्या भगिनी यांना केव्हांही अंतर देऊं नये. त्यांच्याशीं प्रेमभावानें वागावें. त्यांच्या अडीअडचणी लक्षांत घेऊन त्या दूर करण्यासाठीं झटावें. आपल्या पत्नीचा आपण योग्य तो मानसन्मान ठेविला पाहिजे व गृहकृत्यांत तिची सल्ला मसलत घेतली पाहिजे; परंतु बायकोच्या कह्यांत जाऊं नये. स्त्रैण होऊं नये.

—श्रीसाईसच्चरित


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ३९ वें ] मार्च १९६१ [ अंक १२ वा

: संपादक :

गो. वि. क्षीरसागर

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६२३६१

: कार्यालय :

साई निकेतन,' व्हिन्सेंट रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४/बी, दादर, मुंबई १४

# प्रिय वाचक—

**या** महिना अखेर श्रीरामनवमी महोत्सव येत आहे; व दरवर्षाप्रमाणें शिरडी येथें यंदा ता. २४, २५ व २६ मार्च या तीन दिवशीं श्रीराम जन्माचा सोहळा थाटामाटांत साजरा होणार आहे. तो उत्सव यथासांग व सुव्यवस्थित रीतीनें साजरा झाला पाहिजे. यासाठीं एव्हांपासून उत्सवाची चालक मंडळी झटून आपापल्या कामास लागली आहे.

श्रीरामचंद्र प्रभू हे भारतांत एक आदर्श व आदरणीय महापुरुष होऊन गेले. प्रत्येक मनुष्यानें देवत्वाप्रत जाण्यासाठीं ज्या बहुमोल गुणांचा स्वीकार व आचार करावा; त्या सर्व गुणांचें सुंदर संमेलन श्रीरामचंद्राच्या ठायीं झालेलें होतें.

शिरडींत प्रतिवर्षी अनेक उत्सव होतात; परंतु त्या सर्व उत्सवांत श्रीराम जयंति महोत्सवाला अग्रस्थान देण्यांत आलें आहे. भक्तहि प्रतिवर्षी या महोत्सवास विशेष मोठ्या प्रमाणांत हजर राहून श्रीरामनामाचा सुखसोहळा लुटीत असतात.

श्रीसाईबाबांनीं श्रीरामचंद्रप्रभूचें पुण्यस्मरण करण्याचें व त्यांचा उच्च आदर्श भक्तजनांपुढें ठेवण्याचें महत्त्व ओळखून आपल्या हयातींत हा उत्सव सुरू करविला व आपले परम भक्त ह. भ. प. श्रीदासगणूमहाराज यांचें या महत् व पुण्यकार्यासाठीं जिव्हाळ्याचें सहकार्य जोडून दिलें. त्यांनींहि बाबांची इच्छा ध्यानीं आणून आपल्या सुयोग्य सच्छील सत् शिष्योत्तमाकरवी हें कार्य अखंड चालू रहाण्याची व्यवस्था करून ठेविली आहे. बाबांची इच्छा ध्यानीं आणून श्री साईबाबा शिरडी संस्थानची चालक मंडळीही हा महोत्सव सर्व बाजूंनीं उत्तम प्रकारें साजरा व्हावा; यासाठीं मनोभावें झटत असतात. कोणाचीही गैरसोय होऊं नये; या सोहळ्यांतील आनंद सर्वांना लुटतां यावा व श्री प्रभू रामचंद्राचें पुण्यस्मरण हें जें या महोत्सवाचें उद्दिष्ट तें सर्वांना साध्य करून घेतां यावें; याकडे चालक शक्य तेवढें लक्ष पुरवीत असतात. नेहमींची सुव्यवस्था, सुस्वागत व तत्परता याही वेळीं आपणास आढळून येईल. त्यांत यत्किंचीतही कमतरता दिसून येणार नाहीं.

'श्री साई लीला' या आपल्या मासिकाचा श्री रामनवमी खास अंक प्रतिवर्षा-प्रमाणें ऐन उत्सवप्रसंगीं आपल्या हातीं पडावा, याची तयारी एव्हांपासून तत्परतेनें चालू आहे. त्या खास अंकांत श्रीरामचंद्र, सीतामाई, भरत वगैरे रामायणांतील प्रमुख व्यक्तींवर विद्वानांनीं व विचारवंतांनीं लिहिलेले लेख प्रसिद्ध होणार आहेत. लिहिण्यास आनंद वाटतो कीं, या कार्यांत अनेक विद्वान लेखकांचें सहकार्य आम्हांला लाभलें आहे. ही श्रीसाईबाबांचीच कृपा होय. त्यांच्या प्रेरणेनेंच हें कार्य चालू आहे व ज्यांना ज्यांना आम्ही विनंती करूं त्यांना प्रेरणा देणारे तेच आहेत.

...ची मनोभावें सेवा हें श्रीसाईलीलेचें ध्येय आहे. बाबाच आमच्याकडून यथामति हें कार्य करवूत घेत आहेत. वाचकांची सेवा ही त्यांचीच सेवा आहे. श्रीसाईलीलेसारख्या बाबांच्या सेवेला वाहिलेल्या मासिकाचा प्रचार घरोघर झाला पाहिजे. महाराष्ट्रांतील प्रत्येक घरांतील स्त्रीपुरुषांच्या हातीं हें मासिक पडणें जरूर आहे. या निमित्तानें व एप्रिल श्रीरामनवमी खास अंकापासून नवें वर्ष सुरूं होत असल्यामुळें प्रत्येक वर्गणीदारानें निदान दोन तरी वर्गणीदार मिळवून द्यावे; अशी त्यांना विनंती करावीशी वाटते.

प्रियवाचक! आपल्याशिवाय इतर वाचकांचें, आपल्या मित्रांचें वा नातलगांचें लक्ष या मासिकाकडे वळवून त्यांनाही त्यापासून होणारा लाभ घेऊं देणें हें एक सत्कार्य व सेवाकार्य आहे, असें आपणांस नाहीं का वाटत? आमचे श्रीसाईभक्त वाचक या विनंतीकडे लक्ष पुरवून जरूर तें करतील अशी अपेक्षा आहे. —संपादक

---

शिखांच्या आदिग्रंथांतील—

# संत नामदेवाची अमृतवाणी

: ४ :

माझें मन हा गज आणि जिव्हा ही कातर. यांच्या सहाय्यानें काळाचे पाश मोजून मापून मी कापतों. मला जातीपातीशीं काय करावयाचें आहे? रामनामाचा रात्रंदिवस जप करतों. कपडे रंगवीत असतां व शिवीत असतां रामनाम घेत असतों. रामनामाशिवाय एक घटकाभरसुद्धां मी जगूं शकत नाहीं. हरिभक्ति करीत व हरिगुणगान करीत मी राहतों. मी माझ्या प्रभूचें ध्यान अष्टौप्रहर करतों. माझी सुई सोन्याची आहे व धागा रुप्याचा आहे. नामदेवाचें चित्त सर्वस्वीं हरीकडे वेधलें आहे.

: ५ :

साप आपली कांत टाकतो. परंतु विष कांहीं टाकून देत नाहीं. पाण्यामध्यें बगळा जसा ध्यानस्थ बसतो, त्याप्रमाणें आपलें चित्त जर शुद्ध नसेल तर अशा प्रकारचे जप, तप, ध्यान हीं काय कामाचीं? सिंहासारख्या हिंस्र पशूंचेच खाद्य ज्या नरांना ठाऊक आहे अशा ठगांना देवभक्तीचें निरूपण करण्याचा काय अधिकार आहे? नामदेव म्हणतात, माझ्या प्रभूने सत्यासत्याचा वाद मिटविला आहे. हे दुतोंड्यांनो! तुम्ही रामनाम रसायन प्राशन करा.

तुम्हाला पर ब्रह्माची ओळख होईल तर कोणतीच आशा राहाणार नाहीं. अंतःकरणांत रामभक्ति जागृत ठेवाल तर तुमचें मन सर्व काळजींतून मुक्त होईल. हे मना! विषयरूपी संसार सागरांतून तूं कसा रे तरून जाशील? खोट्या मायेला पाहून तूं तर अगदीं भुलून गेला आहेस. नामदेवांना शिंप्याच्या घरीं जन्म दिला, पण गुरु उपदेशानें आणि संतकृपा प्रसादानें त्याला परमेश्वर दर्शन झालें.

# ईश्वर भक्ति व समाजसेवा

**सुप्रसिद्ध तत्त्वचिंतक व भारताचे भूतपूर्व राष्ट्रपति श्री. सी. राजगोपालाचारी यांनीं श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या उपकारक शिकवणींतील एकेक शिकवण घेऊन लोकोपकारार्थ तिचें सुंदर विवरण 'श्रीरामकृष्ण उपनिषद्' या नांवानें तामीळ व इंग्रजी भाषेंत केलें आहे. गेल्या अंकापासून त्याचा अनुवाद आमच्या वाचकांसाठीं सुरू करण्यांत आला आहे.**

**—आप्पाराव**

एके दिवशीं कांहीं तरुण उत्साही मंडळी परमहंस रामकृष्ण यांच्याजवळ आली व त्यांना उद्देशून म्हणाली, 'आम्हीं कांहीं मंडळींनीं समाजसेवेला वाहून घेण्याचें ठरविलें आहे.'

त्या उत्साही तरुणांस उद्देशून श्रीरामकृष्ण म्हणाले, 'तुम्हीं घेतलेला निर्णय खरोखर प्रशंसनीय आहे. समाजसेवेच्या कार्यांत स्वतःला गुंतविणें हें फार चांगलें. परंतु प्रथमतः ईश्वराची भक्तिभावानें प्रार्थना करा. त्याचें अंतःकरणपूर्वक चिंतन करा व त्या मार्गानें आपापलें अंतःकरण पवित्र बनवा. आणि मग समाजसेवेच्या कार्याकडे वळा. देवाचें स्मरण कराल, त्याला अंतःकरणांत आठवाल तर तुम्हांला सेवेसाठीं जरूर असलेलें सामर्थ्य प्राप्त होईल. भक्तिभावानें व मनापासून देवाची प्रार्थना केल्यास सत्कृत्यांकडे वळण्याची प्रेरणा तुम्हांला लाभेल. देवाच्या कृपाप्रसादामुळें कोणतेंहि कार्य चतुराईनें करण्याचा मार्ग मोकळा होईल व त्यासाठीं जरूर असलेलें मार्गदर्शन मिळून साधनेंहि आटोक्यांत येत जातील. देवाची प्रार्थना नेहमीं करावी. त्यामुळें अननुभूत सामर्थ्य प्राप्त होतें. त्याच्या एकनिष्ठ भक्तांनीं त्यांच्या स्तुतीपर जीं गीतें रचिलीं आहेत, तीं नेहमीं गात जा. आणि मग समाजसेवा उत्तमप्रकारें कशी करावी हें तुम्हांला आपोआप समजेल.

× × ×

श्री रामकृष्ण परमहंस यांची ही शिकवण ज्याला ज्याला म्हणून समाजसेवा व देशसेवा करावयाची आहे अशा प्रत्येक सेवकानें मनन करून आचरणांत आणण्यासारखी आहे. आपल्या हातून समाजकल्याणाच्या गोष्टी घडाव्या असें वाटत असतें. मनाची अशी फार आकांक्षा असते; परंतु हें करूं कीं तें करूं, या भावनेनें मनाला चौफेर भटकूं देऊं नका. मी कोणतें कार्य अगोदर हातीं घेऊं याचीही चिंता करीत बसूं नका. तुमच्या हाताशीं जें कार्य असेल त्या कार्यानें सुरूवात करा. यापेक्षां तें कार्य

महत्वाचें आहे; त्यामुळें माझें नांव होईल; या भावनेनें कोणतेंही कार्य करूं नका. समाजासाठीं कार्य करावयाचें त्यांत स्वार्थ असूं नये. मग तेथें फायद्याचा किंवा कीर्तीचा प्रश्नच आपल्या मनांत येतां कामा नये. कोणतीही गोष्ट कर्तव्य बुद्धीनें करावयाची. एक चित्तानें ईश्वराचें चिंतन करा. त्याच्यावर संपूर्ण श्रद्धा ठेवा आणि निःस्वार्थपणें व पवित्र भावनेनें सेवा करण्यासाठीं बद्धपरिकर व्हा.

× × ×

देशाची सेवा अनेक मार्गांनीं करतां येते. देशाची काय किंवा समाजाची काय, सेवा करणें, त्या कार्याला वाहून घेणें, ही चांगली गोष्ट आहे; परंतु मानासाठीं किंवा कोणत्याही स्वार्थासाठीं त्या पवित्र क्षेत्राकडे वळावयाचें नाहीं. नांवासाठीं त्या क्षेत्रांत तुम्हीं पदार्पण केलें तर एखाद्या आणिबाणीच्या प्रसंगीं तुमचें कार्य लंगडें पडेल. त्यांत बल किंवा उत्साह रहाणार नाहीं. त्या कार्यांत तुम्हीं यश मिळविणार नाहीं. तुमच्या अंतःकरणांत कीर्तीची आकांक्षा दबा धरून राहिलेली असेल तर तुमचें कार्य कितीहि उदात्त असलें तरी त्यासाठीं तुमचे प्रयत्न निष्फळ ठरतील हें विसरूं नका.

पुष्कळसे देशभक्त किंवा समाजसेवक यांच्यावर 'मी इतरेजनांसाठीं इतकें इतकें केलें परंतु त्यापासून मला कांहींच फायदा झाला नाहीं.' ही पश्चात्ताप करण्याची जी पाळी येते, हें जें मनाला दुःख होतें, त्याचें काय बरें कारण ? याचें कारण कोणत्या तरी स्वार्थी इच्छेनें त्या कार्यांत तीं माणसें पडलेलीं असतात. आणि त्यांत त्यांना यश मिळालेलें नसतें. नांव किंवा कीर्ति मिळविण्यासाठीं जो कोणी समाजसेवेकडे किंवा देशसेवेकडे वळतो त्याच्यावर दुःख करीत बसण्याची पाळी यावयाचीच. ही इच्छा अत्यंत अपवित्र आहे. कितीही महत्वाचें सत्कार्य असलें तरी त्याचा त्यामुळें शेवटीं नाश व्हावयाचा. दुसऱ्याच्या कल्याणासाठीं किंवा समाजकल्याणासाठीं आम्हीं जें जें कार्य करूं तें ईश्वरार्पण केलें पाहिजे. त्याच्या नांवानें कोणतेंही कार्य करावयाचें व तें त्यालाच अर्पण करून मोकळें व्हावयाचें; म्हणजे त्याच्या कृपेचा प्रसाद आपणांस मिळाल्याशिवाय रहात नाहीं. अशा भावनेनें आम्हीं कोणत्याही कार्याकडे वळलों व त्यांत यश मिळालें तरी आम्हीं आनंदानें बेहोष होणार नाहीं. तसेंच अपयश मिळालें असतां त्यामुळें आपण दुःखीकष्टी होणार नाहीं वा खचूनही जाणार नाहीं.

आम्हीं कोणत्याही सेवाकार्यांत आपल्या फायद्यासाठीं किंवा नाव मिळविण्याची भावना अंतःकरणांत ठेऊन पदार्पण केलें तर तीं खरीखुरी सेवा होऊं शकणार नाहीं. तो एक प्रकारचा रोजगार धंदा मात्र होऊं शकेल. होय; ही सत्य गोष्ट आहे कीं, ज्यांनीं स्वतःला देशसेवा कार्याला वाहून घेतलें त्यांना नांव व कीर्ति यांचा लाभ झालेला आहे, परंतु अशीं जीं कीर्तिवंत माणसें आहेत किंवा पूर्वी होऊन गेलीं ती माणसें कीर्तिच्या मागें लागलेलीं मुळींच नव्हतीं. त्यांना त्यांच्या अंगीकृत कार्यांत यश मिळालें याचें कारण त्यांनीं नांवासाठीं किंवा कीर्ति लाभ व्हावा म्हणून त्या क्षेत्रांत

पदार्पण केलेलें नव्हतें. आणि आपण नेहमीं पहात आलों आहोंत कीं जी माणसें स्वार्थासाठीं किंवा कीर्तीसाठीं चळवळींत शिरलीं, त्यांची शेवटीं निराशाच झालेली आहे.

× × ×

कांहीं तरी फायद्याची किंवा निदान कीर्तीची तरी अपेक्षा केल्याशिवाय समाजसेवेच्या क्षेत्रांत पाऊल तरी टाकायचें कसें? अशा शंकाकुशंकांची ज्यांना बाधा होते त्यांनीं आपल्या गृहकृत्यांत व घराच्या व्यापांत स्वतःला गुंतवून स्वस्थ रहावें. त्यांनीं आपल्या घरादारापुरतें परंतु उत्तम प्रकारें त्याच मार्गानें क्षेत्रांत वावरावें व त्यांतच समाधान मानून रहावें. अशा रीतीनेंहि त्यांना समाजसेवेला हातभार लावण्याचें पुण्य लाभेल. समाजसेवेंत पदार्पण करून नंतर आपली स्वार्थी इच्छा पूर्ण न झाल्याबद्दल दुःखी कष्टी होण्याचा प्रसंग त्यांनीं स्वतःवर ओढवून घेऊं नये.

मनांत कांहीं ना कांहीं इच्छा अथवा स्वार्थ साधायचा असल्याशिवाय समाजसेवेकडे वळणें कठीण आहे हें तर खरंच. आणि म्हणूनच श्रीरामकृष्ण सांगतात कीं, 'समाजसेवेच्या कार्यांत पदार्पण करण्यापूर्वी ईश्वराची कृपा संपादन करा. त्याचा विसर पडूं देऊं नका. भगवंतांची मनोभावें प्रार्थना करा कीं, 'हे भगवान्! अंतर मम विकसित कर हे परात्परा! माझें अंतःकरणें भक्तिभावानें व तुझ्या प्रेमानें ओतप्रोत व्यापिलें जावो।'

जे कोणी समाजसेवा कार्यांत सर्वस्वी मग्न होतात, त्यांच्या दृष्टीनें श्रीरामकृष्णांची ही धोक्याची सूचना अत्यंत महत्वाची आहे. पुष्कळांस असा खेद होत असतो कीं, आपण जे एवढे परिश्रम घेतले ते व्यर्थ गेले व जो कांहीं पैसा खर्च केला तो सारा पाण्यांत गेला! याचें अंतस्थ व सहसा न उमगणारें कारण म्हणजे त्या प्रश्नाकडे पहाण्याची आपली मनोवृत्तीच होय. ही कांहीं लहान सहान चूक नव्हे. दुधांत एखादाच ताकाचा थेंब पडला असतां त्या दुधाचें स्वरूप पालटून त्याचें दह्यांत रुपांतर होतें. नांव कीर्ति संपादन करण्याच्या भावनेवर ज्या इमारतीचा पाया रचण्यांत आला त्या इमारतीला दुसरा कोणता बरें आकार यावयाचा? जी इमारत कच्च्या पायावर उभारलेली, ती एक दिवस कोसळून पडावयाची व शेवटीं दुःखाला कारण व्हावयाची. आणि म्हणूनच श्री रामकृष्ण म्हणतात कीं, 'तुम्हीं समाजसेवेंत पदार्पण करण्यापूर्वी ईश्वराची मनोभावें प्रार्थना करा. त्याच्या कृपाप्रसादाला पात्र व्हा. भक्तिजलाच्या सिंचनानें तुम्हीं आपलें मन पवित्र बनवा. पाया खंबीर व टिकाऊ असला म्हणजे त्यावरील इमारत मग ती कितीही मोठी असू द्या; ती टिकाऊ स्वरूपाची होईल.

× × × ×

एखाद्यावर शस्त्रक्रिया करण्यापूर्वी शस्त्रक्रियाविशारद डॉक्टर प्रथम काय बरें करतात। ते आपले हात व हत्यारें जंतूविनाशक औषधानें साफ धुतात आणि नंतर शस्त्रक्रीया सुरू करतात. त्याचप्रमाणें ज्यांना समाजसेवा कार्याकडे वळावयाचें आहे, त्यांनीं प्रथमतः आपल्या मनाचें शुद्धिकरण करावें आणि मग भगवंताच्या कृपेनें सर्व कांहीं ठीकठाक होईल.

अंगीकृत कार्यांत यशस्वी होण्याचा व मनाची शांति मिळविण्याचा दुसरा मार्ग नाहीं. सांगितला हाच राजमार्ग आहे. कर्ता करविता ईश्वर आहे, तोच सर्व समर्थ आहे, ही जाणीव मनांत उत्पन्न झाली पाहिजे व त्यालाच सर्वतोपरी शरण जाण्याची वृत्ति अंतःकरणांत बळावली पाहिजे; परंतु हें कसें साध्य होणार? एखादा दुसरा मंत्र पुटपुटल्यानें का हें साध्य होणार आहे? मुळींच नाहीं! तें निर्जिव, शुष्क कर्मकांड काय कामाचें? त्याच्या कसला परिणाम होणार आहे? आपल्या अंतःकरणांत शुद्ध भक्तिभावाचा झरा अखंड वहात राहिला पाहिजे. शुद्ध प्रेम पाहिजे. नकली, दिखाऊ भक्ति काय बरें कामाची! मनाची अशा प्रकारची तयारी होईल तेव्हांच कोणीही झालें तरी समाजसेवा कार्याकडे वळावें? ईश्वराचा कृपाप्रसाद संपादन केल्याशिवाय एखादें कार्य आरंभणें निरर्थक व स्वतःची फसवणूक करून घेण्यासारखें आहे. त्यामुळें पदरांत दुःख, राग व मत्सर याशिवाय दुसरें काय बरें पडणार?

भगवान रामकृष्णांच्या शिकवणीनुसार आम्हीं एखाद्या समाजसेवा कार्याकडे वळण्यापूर्वी देवाची आठवण करावी व त्याची भक्तिभावपूर्वक पूजाअर्चा करावी. एवढेंच नाहीं तर आम्हीं समाजकार्यांत वावरत असतां आपल्या मनाची अशी भावना होऊन राहिली पाहिजे कीं, देव माझ्या सांगाती सदासर्वकाळ आहे, माझी प्रत्येक कृति तो लक्षपूर्वक पहात आहे.

× × x ×

समाजसेवा व ईशपूजा ही एकमेकांपासून भिन्न आहेत असें समजणें चूक आहे या दोन्हीं गोष्टी एकमेकांपासून मुळींच भिन्न नाहींत. आपल्या हातून घडणारे प्रत्येक कार्य ईशपूजा या नात्यानेंच घडलें पाहिजे. ईशस्मरण हें तुमच्या कोणत्याहि कार्याआड येणार नाहीं; उलट तें सहाय्यकारीच होत असतें. ईशसेवा, देवभक्ति म्हणून आम्हीं आमचें प्रत्येक कार्य करूं लागलों तर आम्हांला अननुभूत अशा आनंदाचा लाभ होईल. महात्मा गांधीजींनीं आपल्या अंगीकृत कार्यांत जें एवढें प्रचंड यश मिळविलें त्याचें मूलभूत कारण कोणतें असें कोणी मला विचारल्यास मी निश्चितपणें हेंच सांगेन. या बाबतींत माझ्या मनांत जरासुद्धां शंका नाहीं. जी जी गोष्ट करायला त्यांनीं हातीं घेतली, जो जो बेत त्यांनीं रचिला व जें जें पाऊल त्यांनीं टाकिलें त्या त्या वेळीं, माणूस रस्त्यानें चालू लागला म्हणजे त्याची पडछाया जशी त्याच्या सांगाती जात असते त्याचप्रमाणे देवासंबंधींच्या विचारानें त्यांच्या अंतःकरणांत ठाव घेतलेला असे. त्या विचारानें त्यांच्या कार्यांत अडथळा केव्हांही उत्पन्न झाला नाहीं. उलटपक्षीं त्यांना जें यश मिळत गेलें त्याला ईश स्मरण हेंच प्रमुख कारण होतें. त्याचप्रमाणें आम्हीं आमच्या जीवनांत जीं जीं लहानमोठीं कार्यें हातीं घेऊं, त्या त्या वेळीं देवाचें स्मरण आम्हांला रहावें, आमच्या सांवलीप्रमाणें तो आमच्या सांगाती रहावा व न बोलतां सवरतां आमच्या यशाला त्यानें कारण व्हावें. जो कोणी समाजसेवक आहे त्याच्या अंतःकरणांत देवाचें ठाणें सदासर्वकाळ असलेंच पाहिजे. शस्त्रक्रियेंत जंतुविना-

# नेहमीं चालत, आगे कूच करीत रहा

**‘थांबला तो संपला’–हा या जगाचा न्याय आहे. यासाठीं देवाचें नांव घेऊन नेहमीं ‘आगे बढो’ हें तत्व दृष्टीसमोर ठेवा व त्याचें आचरण करीत जा. गतीमान रहाणें हेंच जीवन समृद्धीचें साधन आहे.**

चालत रहा; नेहमीं पुढें जात जा. आगे बढो. हा कल्याणाचा शाश्वत मार्ग आहे. जो नेहमीं गतीमान असतो तो सुखी, शक्तिसंपन्न व दीर्घजीवि होऊन रहात असतो. जो थकून भागून किंवा थकला भागला नसतांही एका जागीं बसून रहातो तो निर्बल, निरुत्साही व अल्पजीवि होत असतो. शरीर शास्त्राचा हा नियमच आहे.

**गती म्हणजे जीवन**

हेंच पहा ना. सतत झुळझुळ किंवा वेगानें वहात असलेल्या नदीचें पाणी कसें शुभ्र, स्वच्छ व उत्साहभरानें खळखळणारें असतें. आणि डबक्यांत भरलेलें पाणी तें वहात नाहीं. जागच्याजागीं स्थिर असतें, तें अस्वच्छ दुर्गंधी व आरोग्य विघातक असतें. एका जागीं स्थिर रहाणें म्हणजे रोगी बनणें. चालणें, धावणें, पळणें, गतीमान होणें, पुढें पुढें जात रहाणें व त्यासाठीं धडपडणें म्हणजे निरोगी बनणें, आपलें आयुष्य वाढाविणें.

गती म्हणजे जीवन आणि स्थिरता म्हणजे मरण. ‘जो थांबला तो संपला.’

निसर्गाची या जगाची रचनाच अशी आहे! आपल्या सभोंवार, वर खालीं जरा पहा ना. अनंत आकाशांत भ्रमण करणारा सूर्य पहा. तो सकाळपासून संध्याकाळपर्यंत सारें त्रिखंड फिरत चालत असतो. सर्वांना प्रकाश, उत्साह व जीवन देत असतो. त्याच्या त्या गतिशीलतेमुळें असंख्य लोकांना गती, चालना मिळत असते. प्रेरणा प्राप्त होत असते. त्याच्या गती शीलतेमुळें साऱ्या जगाचें पालन पोषण होत असतें. आणि तोच जर जागच्या जागीं थांबला तर काय? साराच बाजार आटोपला म्हणून समजावें.

---

शन जसें आवश्यक आहे; त्याचप्रमाणें कोणत्याही कार्यांत यश मिळविण्यासाठीं ईशस्मरण अत्यावश्यक आहे. पवित्र मन, ईशप्रेमानें भारावलेलें मन ही खरोखर मोठी धनदौलत व यशाप्रत नेणारी साधनाच आहे. शुद्धभक्ति हाच तिच्या प्राप्तीचा एकमेव मार्ग आहे.

जीवजन्तू, पशुपक्षी यांच्याकडे जरा नजर फेका. ते नेहमीं गतीमान असतात. केंव्हांही एका जागीं बसून रहाणार नाहींत. बसून रहातील तर मरतील! त्यांना नियतीचा, निसर्गाचा कायदा बरोबर माहीत असतो. ते गतीमान असतात, सतत चालत हिंडत फिरत असतात म्हणून तर आनंदांत व सुखासमाधानांत असतात. उत्साहपूर्ण असतात.

## क्रियाशील बना

गती म्हणजे उत्साहाचें प्रतीक व जिवंतपणाचें लक्षण, गतीमान व्हा. क्रियाशील बना. असे वागतील तेच जिवंत राहूं शकतील व भूतलावर सुख, समाधान भरपूर प्रमाणांत लुटूं शकतील. जो निष्क्रिय होऊन स्वस्थ पडून रहातो तो लौकरच मृत्यूच्या तावडींत सांपडतो. त्याचीं गात्रें आस्ते आस्ते शिथील होतात व शेवटीं अगदीं निकामी होतात.

प्राणिशास्त्राचा हा नियमच आहे कीं, आपण आपल्या शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक शक्तींचा निरंतर उपयोग करीत राहिलें पाहिजे. विचारानें, आचारानें त्यांची वारंवार घासाघीस होत राहिली पाहिजे. त्यामुळें शारीरिक मानसीक व आध्यात्मिक शक्तींची वाढ होत जात असते. नाहींपेक्षां त्यांना गंज चढून त्या शेवटीं निकामी बनतात. आपले हात काय किंवा पाय काय, सतत हालचाल करीत राहिले तरच ते धष्टपुष्ट व काम देणारे होतील. नाहींतर जागच्याजागीं आखडून जातील; निर्जीव बनतील.

नेहमीं गतीमान रहाण्यांत फायदा कसा असतो यासंबंधीं एक लेखक म्हणतात, 'बाहेरचीं उदाहरणें मी घेत नाहीं! माझ्या मातेचेंच घेतों. ती भल्या पहांटे पांच वाजतां उठते व आपल्या कामास लागते. ती थंडी किंवा गरमा कांहीं जाणत नाहीं. आणि त्याची तिला बाधाहि होत नाहीं. स्नान आटोपून पूजा अर्चा, ध्यान धारणा यांत कांहीं वेळ घालवून व गीतेचा एक अध्याय वांचून आनंदी मनानें स्वयंपाकाच्या कामांत गढून जाते.

भोजन झाल्यानंतर थोडा वेळ विश्रांति घेऊन पुनश्च ती कामाला जुंपली जाते. शिवणें, टिपणें, निवडणें, वगैरे कामांत ती गुंतून जाते. देवाचें नामस्मरण चालूच असतें. भोजनोत्तर रात्रौ झोपी जाते. हां हां म्हणता ती झोपी जाते. तिला फार शांत झोप लागते; कारण ती थकली भागलेली असते. कमीत कमी खाणें, कमीत कमी व साधीं वस्त्रें परिधान करणें आणि दिवसभर काम करणें हाच तिचा नित्यक्रम. तिची प्रकृति त्यामुळें छान राहिली आहे. यांचें कारण? ती सदा सर्वकाळ गतीमान असते. आळसांत बसून कधींही रहात नाहीं.

## आरोग्याचा मार्ग

कामकाज करणाऱ्याला भूक चांकली लागते. खाल्लेल अन्न चांगलें पचतें व आरोग्य संपदा सहजासहजीं हातीं येतें.

आजकालचा मानव आरोग्यहीन बनला आहे. त्याचें शरीर नाना रोगांचें माहेरघर होऊन राहिलें आहे. याचें कारण त्याला स्वस्थ आळसांत बसून रहायला हवें. काम धंदा करायला नको. खुर्चीवर बसून आराम घ्यायला हवा; परंतु आरामखुर्चीला खिळून राहिल्यानें आरोग्य मिळत नाहीं. खुर्चीचा मोह सोडून बाहेर पडलें पाहिजे. कामानिमित्त चालत फिरत राहिलें पाहिजे. शरिराचें घर्षण झालें पाहिजे. शरीर, हात, पाय कामाकाजांत गुंतून राहिले पाहिजेत. मग आरोग्य तुमच्यापासून केव्हांही दूर पळणार नाहीं.

'सतत चालत रहा' यांत किती तरी अर्थ भरलेला आहे. नेहमीं कांहीं ना कांहीं कार्य करीत रहा. आळसांत वेळ गमावूं नका, हाच त्याचा अर्थ. शरीर सदासर्वकाळ कामाकाजांत व सुविचारांत गुंतून राहिलें पाहिजे. याचाच अर्थ चालत रहा; गतीमान व्हा. थबकूं नका. स्थिर राहूं नका.

आमच्या उपनिषदांतून व वेदांतून यशस्वी जीवनाचा हाच महामंत्र सांगण्यांत आलेला आहे. क्रियाशील व्हा. गतीमान व्हा. सतत चालत रहा, चालत रहा. तरच तुमचें जीवन वैभवसंपन्न व तेजस्वी होईल.

ज्याला अमृतानुव घ्यायचा आहे, जीवनांतील अमृत चाखावयाचें आहे, त्याला गतिमान झाल्याशिवाय दुसरी गती नाहीं; दुसरा मार्ग नाहीं.



MATUNGA CLEANING WORKS
ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN
MODI NIWAS, BOMBAY 19
Washers, Dyers and Dry Cleaners.
A Pleasure to You—A Satisfaction to Us
Chemical Cleaners, Super Fine Darners
Master Dyers
*FOR*
Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths
सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार
माटुंगा क्लीनिंग वर्क्स
(स्थापना १९३४) मोदी निवास, मुंबई १९ (मालक : एस. व्ही. प्रधान)

# रागाचा पारा चढतो तेव्हां ?

**राग हा जणूं काय आमच्या बारशाला पुजलेला आहे. परंतु कोणावरही रागावणें फार वाईट. राग हा आपला महान् शत्रू आहे. मग त्याचा पाडाव कसा करायचा ?**

कोणी शिव्या दिल्या किंवा अपशब्द बोलला तर त्याला उत्तर शिव्यांनीं दिलें कीं मामला वाढत चालला. शिव्यांनीं शिव्या वाढत जातात. मग त्यावर उपाय काय ? कोणी शिव्या दिल्या किंवा अपशब्द उच्चारले तर चूप रहाणें यासारखा दुसरा मार्ग नाहीं.

कबीर महात्म्यानें हाच उपाय शेंकडों वर्षांपूर्वी सांगून ठेविला आहे.

आवत गाली एक है, उलटत होय अनेक।
कह 'कबीर' नहिं उलटिये, वही एककी एक ॥

वारा सोसाट्याचा वहात असला म्हणजे आग भडकते. जोरजोरानें पेटूं लागते व मग साराच भडका उडून जातो. रागाच्या भरांत शिव्यांच्या आहुत्यांवर आहुत्या पडूं लागल्या कीं, तो अग्नी चालला भडकत ! परंतु त्यांत आहुत्यांची भर नाहीं पडली तर काय ? तो अग्नी जागच्याजागीं थंडावतो ! केवळ शिव्यांनीं भागत नाहीं. उभयतांत शिव्यांचा भडका सुरू झाला म्हणजे प्रकरण हातघाईवर येतें. लट्ठालठ्ठी सुरू होते. आणि कधीं कधीं त्याचा शेवट रक्तपातांत व खुनांतहि होत असतो. एका वस्तूचे हे वेगवेगळे पैलू आहेत !

× × × ×

एकदां भगवान बुद्ध भिक्षेसाठीं बाहेर पडले होते. एका गृहस्थाचा दरवाजा बंद होता म्हणून त्यांनीं दरवाजा खडखडावला. धनिकांची जात महाबिकट असते.त्यांना पैसा सोडणें जिवावर येत असतें. दारावर कोणी भिक्षुक आला तर नसेल कांहीं द्यायचें तर नका देऊं; परंतु निदान दोन गोड शब्दांनीं त्याची संभावना करायला गांठचें कांहींच खर्च होत नसतें; परंतु मनाची तेवढी सुद्धां तयारी नसते. त्याचें स्वागत शिव्यागाळींनीं केलें जातें ! भगवान बुद्धालाही तोच प्रसाद मिळाला. धनिकाला संपत्तीचा तोरा होता. त्याला बुद्ध काय किंवा कोण काय ! सारे एका माळेचे मणी !

बुद्धदेव म्हणाले, " मला एक गोष्ट विचारावीशी वाटते; विचारूं का ?

धनिक म्हणाला, ' होय; गोष्टी काय, दोन चार वाटेल तेवढ्या विचारा ! '

बुद्धदेवः—आपण एखाद्याला एखादी वस्तू दिली व ती कांहीं कारणामुळें त्यानें नाहीं स्वीकारली तर ती कुठें जाईल ? तिचा मालक कोण ?

धनिकः—ती माझी माझ्याजवळ परत येईल व तिची मालकी माझ्याजवळच राहील.

बुद्धदेव :—होय ना; मग तुम्हीं मला जें शिव्यांचें दान दिलें त्याचा मी स्वीकार करीत नाहीं !

धनिक बिचारा शरमला !

× × ×

शिव्या किंवा अपशब्द ही काय चीज आहे? ती आपल्या अंगाला चिकटूं शकत नाहीं किंवा जखमहि करूं शकत नाहीं. तेव्हां तिची उपेक्षा करणें हाच रास्त मार्ग होय. आपण जेव्हां शिव्यांचा स्वीकार करून उलट शिव्यांचा वर्षाव करूं लागतों; तेव्हांच सारा मामला बिघडतो. एक गृहस्थ शिव्या देऊन आपली जिव्हा विटाळीत आहे तर त्याला मर्जीनुरूप खुशाल तसें करूं द्यावें. आपण तोच मार्ग स्वीकारून वाणी विषारी बनवूं नये.

× × ×

केव्हां केव्हां स्फुरण चढतें. त्वेष वाढूं लागतो. जागृत राहून मनावर ताबा ठेवण्याची तीच वेळ असते. राग येतो. क्रोधावेश फार वाईट. अशावेळीं प्रयत्न करून मौन बाळगणें, मुखावाटे एकहि शब्द न येऊं देणें हाच श्रेयस्कर मार्ग.

अशावेळीं शांत रहाणें हाच उचित मार्ग होय. कोणी बडबडत असला तर त्याला खुशाल बडबडूं द्यावें. आपल्या मनावर त्याचा यत्किंचितहि परिणाम होऊं देऊं नये.

एका संतानें यावर रामबाण उपाय सांगून ठेवला आहे. त्यांनीं सांगितलें कीं, आज मला कोणी नाराज केलें व माझें रक्त गरम होण्याची वेळ आली तरी मी क्रोधाच्या आधीन होतां कामा नये. रागाच्या भरांत जशास तसें हा न्याय अंमलांत आणावा अशी तीव्र भावना जागृत झाली; परंतु मी क्रोधाच्या स्वाधीन झालों नाहीं. शांत राहिलों. शांत रहाण्याची अशीच संवय केली पाहिजे. राग, क्रोध हे सहज विचार आहेत; परंतु विचारानें त्यांना आटोक्यांत ठेवलें पाहिजे.

× × ×

शांतता हा शब्द किती गोड आहे व त्यांत केवढी जादू भरलेली आहे ! शांत म्हटल्याबरोबर मनाला किती आराम वाटतो नाहीं कां ? त्या शब्दाच्या केवळ उच्चारानें शांत वाटूं लागतें.

कितीही रागीट माणूस असला तरी त्यानें शांततेचा जप केला असतां 'ओम् शांती; शांती; शांती; असें म्हणत असतां त्याचा राग शांत झाल्याशिवाय रहाणार नाहीं. हें शांतिस्तोत्र फार उपकारी आहे. त्याचें पठण, मनन आपण सदासर्वकाळ करावें. नुकसान कांहीं होणार नाहीं; फायदाच होईल.

× × ×

रामनामांत केवढी प्रचंड जादू भरलेली आहे. परंतु रामनाम आमच्या खिजगण-तींत आहे कुठें ! ती जादू दडून राहिलेली नाहीं.. मात्र डोळे उघडून पाहिलें पाहिजे.

जेव्हां रागाचा आवेग अंगांत शिरशिरूं लागतो, रागाची शिरशिरी स्फुरण पाऊं लागते तेव्हां रामनामाचा जप सुरू करावा. तो चांगला दहा पंधरा मिनिटें सुरू ठेवावा. मग पहा जादूची कांडी फिरविल्याप्रमाणें तुमची अवस्था होईल. क्रोधावेग कुठच्या कुठें निघून गेलेला असेल! राम म्हणा, साई बाबा म्हणा किंवा हरेकृष्ण म्हणा. ज्या नामाची तुम्हांला आवड आहे तें नाव भक्तिभापूर्वक घेत रहा. तुम्हीं दुःखमुक्त व्हाल.

× × ×

क्रोधाग्नीनें तुमच्या अंगाचा भडका उडतो आहे का? मग गार पाण्यानें स्नान करा ना! तो अग्नी आपोआप शांत होत जाईल. आमच्या माहितींत एक सद्गृहस्थ आहेत. कुठें रागाची ठिणगी उडाली किंवा कोणी रागाच्या आधीन झाला आहे अशी बातमी लागतांच हातांत गार पाण्याचा तांबा घेऊन ते पळत सुटतात. असें कां बरें करतात ते! भडकलेला क्रोधाचा अग्नी शांत करण्याचें सामर्थ्य पाण्यांत आहे हें त्यांना माहीत आहे. अनेकांच्या बाबतींत त्यांचा तो प्रयोग यशस्वी झालेला आहे. तावून सुलाखून यशस्वी झालेला प्रयोग आहे तो!

स्वामी रामतीर्थ यांनीं म्हटलें आहे कीं, आपल्यावर काम क्रोध किंवा चिंता यांचा पगडा बसूं पहात आहे, अशी जाणीव होतांच एखाद्या नदीच्या किंवा जलाशयाच्या कांठावर जावें; हातांत पाणी घेऊन आचमन करावें, पाणी माथ्यावर शिंपडावें व वाटल्यास त्या पाण्यानें स्नान करावें. शरिरांतील गरमा वा भडका नाहींसा होऊन शान्त वाटूं लागेल. बस्स; आणखी काय पाहिजे तुम्हांला!

× × ×

रागाचा प्रतिस्पर्धी म्हणजे क्षमा! आपल्याकडून कांहीं अपराध घडला असतां, ज्याच्या बाबतींत तो घडला असेल त्याची क्षमा मागावयाची. दुसऱ्या कोणाकडून आपल्या बाबतींत कांहीं अपराध घडला तर त्याला क्षमा करणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे.

ईश्वर आमचे सहस्रशः अपराध पोटांत घालून आम्हांला नाहीं का क्षमा करीत? मग आम्हीं आमच्या बंधु भगिनीला, तोच कित्ता गिरवून कां बरें क्षमा करूं नये?

× × ×

वाटेल तो अपराध घडो. त्याबद्दल क्षमा करण्याची तयारी मी नेहमीं ठेविली पाहिजे. आम्हींच इतरांपुढें स्वतःच्या वर्तनानें हा उच्च आदर्श ठेवावयाचा आहे. माझा कोणी शत्रू नाहीं; माझा कोणी विरोधी नाहीं. सारे माझे मित्र आहेत. मग मी रागवायचें कोणावर! सर्वांच्या कल्याणांत माझेंही कल्याण आहे. ही भावना आपण सतत उराशीं बाळगून त्याप्रमाणें वागलें पाहिजे.

**सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयाः**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दुःखभाग्भवेत्**

# श्रीसाईबाबांची शिकवण

**भगवद्भक्त ह. प. श्री. दासगणू यानीं श्रीसाईबाबांच्या सान्निध्यांत राहून त्यांचा कृपाप्रसाद संपादन केला होता. बाबांची शिकवण त्यांनीं आपल्या आधुनिक संत लीलामृतांतील कांहीं अध्यायांतून ओवीबद्ध करून ठेविली आहे. त्याचाच हा थोडासा विस्तृत परंतु गद्यानुवाद. याचा पूर्वार्ध गेल्या जानेवारीच्या अंकीं प्रसिद्ध झाला आहे. त्याचा हा उत्तरार्ध.**

## नम्र झाला भूतां—

पूर्व कर्मानुसार आपणाला बरी वाईट स्थिति प्राप्त झालेली असते. तें आपल्याच पूर्ण कर्माचें फळ असतें. हें जाणून जी बरी वाईट स्थिति वाट्यास आली असेल त्यांत समाधान मानणें हेंच आपलें कर्तव्य होय. असें रहाणें हाच शहाणपणाचा विचार आहे. शहाणीं माणसें हें समजतात. उगाच धडपड करण्यांत किंवा मनाला लावून घेण्यांत कांहींच फायदा नसतो. आंब्याच्या किंवा कोणत्याहि झाडाला फळें आलीं म्हणजे तीं झाडें ताठ रहात नाहींत तर खालीं वांकतात. त्याप्रमाणें आपलें घर संपत्तीनें भरून गेलें असतां किंवा कोणत्याही प्रकारें समृद्धीची गंगा वहात आली असतां आपल्या अंगीं ताठा येऊं नये; तर आपण नम्रतेनें खालीं वाकावें. संपत्ती ही काय शाश्वत टिकणारी वस्तू थोडीच आहे! दो दिवसाची सोबतीण! कधीं जाईल तें समजणार नाहीं. यासाठीं गर्व कशासाठीं वहायचा? नम्र होणें, खालीं वाकणें हें चांगलें असतें; परंतु तें सर्वत्र मात्र चालू शकणार नाहीं. या जगांत दुष्ट दुर्जन लोकही वावरत आहेत. त्यांच्यापुढें तुम्हीं नम्रतेनें वाकला तर ते त्याचा भलताच फायदा घेतील. त्यांच्याशीं गोगलगाय होऊन चालणार नाहीं हें आपण विसरतां कामा नये; म्हणतात ना कीं 'मऊ तेथें खोव.' धनिक नम्रभावानें वागत आहे; तेव्हां त्याला वाटेल तसा लुटूंया व त्याच्या गरीब स्वभावाचा फायदा घेऊंया असें म्हणणारे दुष्ट लोक या जगांत वावरत आहेत. त्यांच्या बाबतींत आपण कठोरपणा व ताठरपणा जरूर स्वीकारला पाहिजे; परंतु त्याचबरोबर एक गोष्ट सतत लक्षांत ठेविली पाहिजे कीं; ज्या ज्या वेळी संत, सज्जन किंवा साधूवृत्तीच्या लोकांशीं संबंध येईल त्या त्या वेळीं त्यांच्याशीं अत्यंत नम्रतेनें व सौजन्यानें वागावयाचें. मेणापेक्षांही मऊ व लव्हाळ्यापेक्षांही नम्र अशी आपली त्यांच्या बाबतींत वागणूक असावी. श्रीमंती ही काय दुपारची सावली. दुपार ओसरली कीं जाग्यावर काय रहात असतें? श्रीमंती दुपारची छाया—हे आपण सदासर्वकाळ लक्षांत बाळगलें पाहिजे. संपतीच्या मदानें धुंद होऊन केव्हांही कोणाला त्रास देऊं नये, छळ करूं नये किंवा अपमान करूं नये. असें करणें फार वाईट; त्यामुळें दुसऱ्याऐवजीं आपलेंच नुकसान होत असतें.

## संपत्तीची जरुरी

दानधर्म जरूर करावा; परंतु आपली प्राप्ति पाहून दान धर्म करावा. कर्ज काढून मोठेपणा मिरवूं नये किंवा दुसऱ्याच्या जिवावर औदार्य प्रगट करूं नये. संपत्ति काय किंवा आपण ज्यांत गुरफटून गेलों आहोंत तो प्रपंच काय, अशाश्वत आहे. त्याला स्थिरपणा किंवा टिंकाऊपणा नाहीं. स्थित्यंतरें सतत घडत असतात. आपल्या पूर्वकर्मानुसार घटना घडावयाच्या हें जरी खरें असलें तरी जो प्रपंच थाटला तो चालू ठेवण्यासाठीं पैशांची जरूरी असते. त्यासाठीं पैसा मिळविला पाहिजे व त्याचा थोडा फार संग्रहही केला पाहिजे.

या आपल्या शरिराला जशी पित्ताची जरूरी आहे तशीच प्रपंचांत पैशांची जरूरी क्षणोक्षणीं भासत असते. तेव्हां द्रव्य जवळ असलें पाहिजे हें निश्चित होय. असें जरी असलें तरी त्यांतच आपलें सारें लक्ष गुंतवून ठेवतां कामा नये. आणि आपण करतों काय ? सारें लक्ष पैशांच्या कमाईवर. त्यापायीं आपणास कांहीं सुचत नाहीं. सदा सर्वकाळ भल्याबुऱ्या मार्गांनीं पैसा मिळविण्यासाठीं धडपडावयाचें व त्यांतच इति कर्तव्यता मानावयाची हा आहे आपला खाक्या ! तेव्हां तसें असूं नये. आपलें मन कृपण असूं नये. तें उदार असावें. शक्तीनुसार दुसऱ्यास म्हणजे गरजवंतास देण्याकडे लक्ष असावें, औदार्य अंगीं जरुर असावें. परंतु वाजवीपेक्षां फाजील औदार्य मात्र कामाचें नाहीं. आपल्याजवळ चार पैसे आहेत. तोंपर्यंत आपल्यासभोंवार भुतें नाचतील; लोक या, बसा, म्हणतील; परंतु जवळ असलेली पैशांची पुंजी संपली म्हणजे या जगांत तुम्हांला कोणी विचारणार नाहीं किंवा तुमच्या वाऱ्यालाही कोणी उभे रहाणार नाहीं. या जगाची रहाटीच अशी आहे; त्याला तुम्हीं काय करणार ? औदार्य व उधळपणा या दोघांची सांगड घातली गेली म्हणजे अनर्थ झाला म्हणून समजावें. उदारपणा असावा परंतु त्याच्या जोडीला उधळेपणा असूं नये. द्रव्याची खरीखुरी जरुरी कोणाला आहे, हें ध्यानीं आणून सत्पात्रीं दान करावें; उगाच जवळ पैसे आहेत म्हणून उठल्या सुटल्या वाटेल त्याला देत सुटूं नये. जरूर तेथेंच हात सढळ करावा.

## सत्पात्रीं दान करावें

जे आंधळे पांगळे, अनाथ व रोगानें पिडलेले आहेत, ज्या मुलांना आईबाप नाहींत बिचारी अनाथ झाली आहेत, अशांना जरूर शक्तीप्रमाणें सहाय्य करावें. लोककल्याणाचें एखादें कार्य असेल व त्याला द्रव्यसहाय्य करणें जरूर असेल तर जरूर सहाय्य करावें. मदत करण्यास सुयोग्य विद्वान आढळून आला व त्याला द्रव्याची फार जरूरी असली तर त्याला हातभार अवश्य लावावा. एखाद्या अनाथ स्त्रीच्या बाळंतपणास धाऊन जावें.

अन्नदानाचे तीन प्रकार सांगितले आहेत. ( १ ) विशेष ( २ ) नित्य व ( ३ ) कार्याकारण परत्वें. आतां प्रथम विशेष स्वरूपाच्या अन्नदानाकडे वळूं या. आपल्या

घरांत संपत्ति ईश्वरकृपेनें भरपूर आहे; आणि अशी परिस्थिति जेव्हां वाट्याला येते व आपण कांहीं सत्कार्य करावें असें मनाला वाटूं लागतें तेव्हां एखादें सहस्त्र भोजन घालावें. मात्र उच्च नीच, जात गोत असले भेदभाव बाळगून सहस्त्र भोजन घालूं नये 'सर्वांठायीं' एकच आत्मा वास करीत आहे. सर्वांचे आत्मे संतुष्ट व्हावें ही आपली भावना असावी. अमूक जातीच्याच लोकांनीं भोजन करावें असली वृत्ती नसावी. माणूस कोणत्याहि जातीचा सुष्ट, दुष्ट कसाहि असो. सहस्त्र भोजनांत सर्व सारखे समजण्यांत यावे. मात्र असलीं भोजनें कर्ज काढून केव्हांहि घालूं नयेत.

दुसरा प्रकार नित्य भोजनाचा. अशा भोजनाचे मानकरी कोण? किंवा कोण-कोणाला नित्यभोजन द्यावें? प्रवासी, तापसी, संन्यासी भुकेनें व्याकूळ झालेले, अशा लोकांना संधी मिळेल त्याप्रमाणें अन्नदान करावें. जे विद्याभ्यास करीत असतात अशा विद्यार्थ्यांना जरूर भोजन घालावें. माधुकरी हे नित्य भोजनास सर्वस्वी योग्य होत. लग्न, मुंज, ऋतुशांति अशा प्रसंगीं भोजनाचा योग जुळवून आणावा. कार्याकारण भोजनदान तें हेंच होय. सण, व्रत उद्यापन वगैरे प्रसंग यांत येतात. अशा कार्यकारण भोजनप्रसंगीं आपल्या इष्टमित्रांस व सगे सोयऱ्यांस प्रेमादरपूर्वक आमंत्रण करून त्यांना भोजन देऊन संतुष्ट करावें.

अन्नदानाचे हे विविध प्रकार आहेत. ते सांगितले व योग्यायोग्य काय त्याचेंही निरूपण केलें. सज्जनानीं या मार्गाचा अवलंब केला असतां त्यांचें कल्याण झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

**अन्नदान व वस्त्रदान**

जें अन्नदानासंबंधीं सांगितलें तेंच वस्त्रदानालाही तंतोतंत लागू आहे. आपल्या अंगीं जशी शक्ति असेल त्याप्रमाणें अन्नदान, वस्त्रदान करावें. शक्तिप्रमाणें गरजवंतास जरूर द्यावें. त्यामुळें आपलें कांहीं कमी होत नाहीं. उलट पुण्य मात्र पदरीं पडत असतें. दुसऱ्याचें दुःख कमी करण्यासाठीं झटणें हें आपण आपलें परम पवित्र कर्तव्य समजलें पाहिजे व कर्तव्य भावनेनें तें पार पाडण्यासाठीं झटलें पाहिजे.

सत्ता हातीं असणें वाईट नाहीं; परंतु केव्हां? त्या सत्तेचा आपण सदुपयोग करूं तेव्हां. या जगांत सत्तामदानें धुंद झालेली व सत्तेचा दुरुपयोग करणारीं माणसें आपणांस ठायीं ठायीं आढळून येतात. न्यायासनावर बसण्याचें भाग्य तुमच्या वाट्यास आलें तर तें पवित्र स्थान लांचलुचपत घेऊन आपण विटाळतां कामा नये. त्या स्थानाचें पावित्र्य स्वतः न्यायानें वागून आपण संभाळलें पाहिजे.

आपल्यावर ज्या कामाची जबाबदारी सोपविली असेल तें कार्य वाटेल त्या परिस्थितींत उत्तम प्रकारें व काळजीपूर्वक पार पाडण्यासाठीं आपण झटलें पाहिजे. आपण आहोंत त्यापेक्षां वेगळे किंवा भडक भासविण्याचा केव्हांही प्रयत्न करूं नये. पोषाख कसा अगदीं साधा असावा. अहंपणाच्या वाऱ्यास जरासुद्धां उभे राहूं नये.

कोणाशींही केव्हांही तोऱ्यानें वागूं नये. कांहीं एक कारण नसतां कोणाचा अपमान करूं नये. लबाड, ठग लोकांना ओळखून असावें व त्यांच्याशीं संभाळून वागावें. मुलें, मुली नोकर चाकर वगैरे तुझ्या दैवयोगानें जी माणसें तुझ्या वाट्याला आलीं असतील त्यांच्याशीं प्रेमानें वागावें. त्यांना हीनपणानें वागवूं नये किंवा त्यांच्याशीं तुसडेपणा करूं नये. बायको, मुलगा, मुलगी व आप्त जन हीं माझीं माझीं म्हणून त्यांच्या मायाजाळांत गुरफटून जाऊं नये. तो अभिमान जर अंगाला चिकटला तर जन्म मरणाच्या फेऱ्यांत तूं सांपडल्याशिवाय रहाणार नाहींस. कोणाच्याही मोहांत सांपडूं नये. आपल्या सभोंवार गोळा झाले आहे तें आपल्या पूर्वकर्मानुसार किंवा आपल्या पूर्वसुकृतानुरुप आपल्या वाट्यास आलें आहे. तें येथल्या येथेंच रहावयाचें आहे. त्याचा लवलेशही शिल्लक रहाणार नाहीं. किंवा अखेरीस तुझ्याबरोबर त्यांतलें कांहीं एक येणार नाहीं. या सर्वांचें महत्त्व त्या त्या जन्मापुरतेंच आहे. मागच्या जन्मीचें कोणाला काय आठवतें आहे ? तो जन्म संपला कीं त्याबरोबर सारें संपलें. त्या त्या जन्माबरोबर नातें गोतें संपत असलें तरी वासना मात्र संपत नाहीं. ती माणसाला चिकटून रहाते व बंधनानें जखडून टाकते आणि ती वासना जी शिल्लक रहाते तीच पुढल्या जन्माला कारण होऊन रहाते. यासाठीं आप्तबांधव, ज्यांना आपण आपले मानतों त्यांच्या मोहजालांत आपण सांपडतां कामा नये. कारण तो केवळ खोटा मोह आहे. तो आपण तोडलाच पाहिजे. त्याशिवाय अक्षय सुखाचा ठेवा तुम्हांला लाभणार नाहीं. त्याची अपेक्षा असली तर खोट्या मोहांत सांपडतां कामा नये.

### ही धर्मशाळेतील वस्ती

असें पहा कीं, आपण प्रवासांत असतों त्यावेळीं विश्रांतीसाठीं मार्गांतील एखाद्या धर्मशाळेचा आश्रय घेतों. तें तेथील रहाणें, कांहीं कायमचें नसतें. तात्पुरतें असतें. कामापुरती तात्पुरती सोय करून घेऊन आपण पुढील प्रवासास निघतों. तेव्हां त्या धर्मशाळेच्या मोहांत सांपडून आपलें चालेल का ? तोच प्रकार येथें आहे. हा घर प्रपंच म्हणजे ही धर्मशाळाच आहे. आणि ती धर्मशाळा आहे असें समजून या संसारांत व संसारांतील माणसांशीं वागावें. येथें असतां आपल्या वाट्यास येईल तें कर्तव्य इमानें इतबारें पार पाडावयाचें आणि जें करावयाचें तें देवासाठीं निरंतर त्याचें, सच्चिदानंदाचें स्मरण करीत करावें. आपलीं मुलें आणि दुसऱ्यांचीं मुलें; त्या सर्वांचा निर्माता एकच भगवंत. मात्र आपल्या घरीं जन्माला आलेल्या मुलाचा भार आपल्या शिरावर. ती जबाबदारी आपण ईश्वराचें स्मरण करून इमानें इतबारें पार पाडावयाची आणि मोकळे व्हावयाचें. बंधनांत सांपडावयाचें नाहीं. त्या मुलाचें उत्तमप्रकारें संगोपन करावयाचें, त्याला चांगल्या प्रकारचें शिक्षण देऊन त्याला कर्तबगार बनवावयाचें; तसेंच त्याच्यासाठीं आपणास मागें ठेवतां येईल तेवढें द्रव्यही ठेवावें; परंतु मी मुलाचें पालन पोषण केलें. त्याला शिक्षण दिलें; आणखी कांहीं कांहीं केलें; त्यासाठीं मागें पैसाही ठेविला, असला अभिमान बाळगूं नये. त्यांत काय केलें ? आपलें कर्तव्य पार पाडिलें.

तें कर्तव्य पार पाडायचेंच असतें. त्यांत कसला अभिमान बाळगायचा ? आपण करणारे कोण ? ईश्वरानें प्रेरणा दिली म्हणून जें करायचें तें केलें. तेव्हां कर्तृत्वाचा धनी कोण आपण नाहीं तर जन्मदाता परमेश्वर. त्या करण्याचें फळ आपण नाहीं घ्यावयाचें; तें त्याचें त्याला अर्पण करून आपण मोकळे व्हावयाचें. त्यांचा संपर्क स्वतःला बिलकूल लावून घ्यावयाचा नाहीं. आपण नावानिराळे होऊन या जगांत वावरावयाचें. या गोष्टीची जाणीव सतत जागृत ठेवावयाची.

## कीर्तिवंत कोण होतो ?

या जगांत बरें कोणतें, वाईट कोणतें याचा बोध ज्ञानामुळें होतो. तें ज्ञान हरप्रयत्नांनीं साध्य करावें. अज्ञानांत राहूं नये. जें आचरणीय व चांगलें तेंच करावें व वाईटाचा त्याग करीत रहावें. एकदां एखादें सत्कार्य हातीं घेतलें म्हणजे त्यासाठीं शक्य व जरूर तेवढे प्रयत्न करून तें तडीस न्यावें व त्यांत यश संपादन करावें. त्यामुळें आपणास कीर्तीचा लाभ होतो. या जगांत आपण कीर्तीरूपानें मागें रहावयाचें आहे. ज्याच्या हातून सत्कृत्यें घडतात त्याचीच कीर्ति मागें रहाते.

आपण कर्तृत्वसंपन्न बनलें पाहिजे. पुरुषार्थी व कर्तबगार बनलें पाहिजे. जगावें परंतु कसें ! कर्तृत्वानें व पराक्रमानें. आपलें जीवन निर्माल्यवत् असूं नये. प्रत्येकानें आपणास विचारावें, मान द्यावा व प्रत्येकाला आपल्याबद्दल आदर भाव वाटावा. अशा स्थितींत जगणें तेंच खरेंखुरें जगणें होय. नाहीं तर जगणें कसलें ? मनुष्य जन्माला येऊन हातून पुरुषार्थ घडला तरच त्या जन्माचें सार्थक; नाहींतर जन्माला आला काय नाहीं आला काय ? दोन्हीं सारखींच पुरुषार्थ किंवा कर्तबगारी गाजवीत असतां तात्पुरता अभिमान बाळगावा; कारण तो कार्याला पोषक असतो; परंतु अंगीकृत कार्यांत यश मिळालें; त्याचें फळ प्राप्त झालें म्हणजे अत्यंत लीनतापूर्वक तो पूर्वाभिमान झुगारून देऊन मोकळे व्हावें. तो अभिमान सदैव उराशीं बाळगून राहूं नये.

आपण जोंपर्यंत जिवंत आहोंत; म्हणजे या देहांत जोंपर्यंत प्राण आहे तोंपर्यंत त्याची काळजी वहाणें, जिवाला व देहाला जपणें जरूर असतें. तें आपलें पवित्र कर्तव्य आपण पार पाडलेंच पाहिजे. परंतु दैवयोगानें मृत्यू आला तर त्याबद्दल दुःख करीत बसूं नये, शोक करण्याचें कारण काय ? कांहींच कारण नाहीं. देवानें दिलें व देवानें नेलें. देणें, नेणें दोन्हीं त्याच्या हातीं. मरण आल्याचा शोक कोण करतो ? सूज्ञ, विचारी व ज्ञानी माणूस कधीं शोक करीत नाहीं. अज्ञानी व मूर्ख असतात ते शोक करतात.

असें पहा कीं, आजवर पाचांची, पंचप्राणांची उसनवारी केली होती; तें कायमची नसते. उसने आणलेलें ज्याचें त्याला कधीं ना कधीं देऊन टाकायचें असतें. वेळ आली तशी त्या प्राण्यानें उसनवारी फेडून टाकिली व आपण मोकळा

झाला. वायू वायुत जाऊन मिळाला, तेजांत तेज जाऊन मिळालें; अशारीतीनें ज्याचें त्याला देऊन टाकलें! हीं पंचभूतें एक दिवस आपआपल्या ठिकाणीं जायचीं असतात. तीं निघून गेलीं तर त्यांत दुःख कां मानायचें? शरीर हा पृथ्वीचा भाग होय. पृथ्वीनें तो भाग आपल्या ताब्यांत घेतला तर त्यांत शोक कां करावयाचा?

## मोक्षाचे धनी केव्हां व्हाल?

त्याचप्रमाणें घरांत मुलाचा जन्म झाला असतां किती आनंद वाटतो मनाला? परंतु तशावेळीं आनंदानें बेहोष होण्याचें कांहीं कारण नाहीं. तो सृष्टीचा व्यवहार आहे. तो उपक्रम अनादिकालापासून अव्याहत चालत आलेला आहे; व पुढेंहि तो चालू रहावयाचा आहे. असा विचार करून स्वस्थ रहावें. आपण जमिनींत बी पेरतों किंवा रुजत घालतों. त्यावर पर्जन्यवृष्टि होऊन त्या बीजाला मोड येतात. त्याला पावसाप्रमाणें सूर्यनारायणहि सहकारी असतो. परंतु त्या मोडाचें रोप वर यायला लागलें व तें वाढूं लागलें म्हणून पावसाला व सूर्याला कुठें आनंद होत असतो? आनंदानें पाऊस व सूर्य नाचूं बागडूं लागले असें ऐकलें आहे का आपण कधीं? त्या रोपट्याचा मोठा प्रचंड वृक्ष होवो वा तो जळून बेचीराख होवो; त्याबद्दल त्यांना सुखदुःख बाधा बिलकूल होत नाहीं. त्याचप्रमाणें सुखदुःखाच्या प्रसंगापासून आपण अलिप्त राहिलें पाहिजे. अशा या स्थितीच्या पलिकडे जाल तेव्हांच तुम्हीं मोक्षाचे धनी व्हाल हें सतत लक्षांत बाळगा.

यानंतर आणखीही महत्वाचें असें मला कांहीं सांगावयाचें आहे; तें सवडीनुसार पुढें तुला कधीं तरी सांगेनच."

श्रीसाईबाबांची ही अमृतवाणी ऐकून चांदोरकर यांस झालेला आनंद अवर्णनीय होता. त्यांच्या डोळ्यांवाटे आनंदाश्रू वाहूं लागले. शरिरावर रोमांच उभे राहिले; आपण कृतकृत्य झालों असें वाटून चांदोरकर नम्रतापूर्वक व कृतज्ञतापूर्वक हात जोडून म्हणाले, "हे साई समर्था! आपण कृपाळू होऊन माझा उद्धार केला. आपल्या बोधामृतरूपी मेघाचा माझ्यावर वर्षाव झाल्यामुळें अज्ञानाचा सारा केरकचरा धुवून गेला आहे. आपण माझ्यावर जन्मोजन्मीं फिटणार नाहींत असें महदुपकार करून ठेविले आहेत. ते कधींहि विसरायला होणार नाहींत. निमोणकरहि हर्ष भरीत झाले; आणि दोघेहि बाबांचा प्रेमळ निरोप घेऊन आपापल्या घरीं गेले.



# देव भावाचा भुकेला !

****************************

**पंजाब प्रांतांत धन्ना भगत हा एक महान् सत्पुरुष होऊन गेला त्याचा भक्तिभाव अनन्य साधारण होता. संत नामदेवाच्या पूर्वायुष्याशीं त्याची थोडीशी तुलना करतां येईल. भोळ्या व शुद्ध भक्तिभावामुळें त्याचें सारें जीवन उजाळलें. आणि त्यानें ज्याची गुरुस्थानीं स्थापना केली त्या पंडितजींचें काय झालें ?**

पंजाब प्रांतांतील एका खेड्यांत एक जाट रहात असे. त्याच्या चिरंजीवाचें नांव होतें धनीराम. परंतु गांवांतील लोकांनीं व शेजाऱ्यापाजाऱ्यानीं धनीरामाचा 'धन्ना' करून टाकला होता; बालपणीं आपण एखाद्या मुलास किंवा मुलीस ज्या नावानें हांक मारतों तेंच नांव पुढें मोठेपणींही कामचलाऊ होऊन रहात असतें. धन्नाचेंही तसेंच झालें. धन्ना बारा वर्षांचा झाला आणि त्याचे वडील त्याला सोडून गेले. घरांत आई व तो अशीं दोघेंच राहिलीं. धन्नाला कोवळ्या वयांत शेतीभातीकडे वळावें लागलें, पोटाची खळगी भरली पाहिजे ना !

कोणे एके दिवशीं बाहेर गावांहून फिरत फिरत एक विद्वान पंडित महाशय त्यांच्या घरीं आले व वस्तीस राहिले. ती सायंकाळची वेळ होती. दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्या पंडितानें स्नान केलें व पोथडीतून शाळिग्रामाची छोटी मूर्ति काढून त्याची पूजाअर्चा केली. मिठाईचा प्रसाद आणून त्याचा नैवेद्य दाखविला. धन्ना जवळपास होता. तो तें सर्व लक्ष्यपूर्वक न्याहाळीत होता. पंडितानें थोडा प्रसाद धन्नाच्या हातावर ठेऊन बाकीचा आपण भक्षण केला.

सर्व कार्यक्रम आटोपून पंडीतजी बाहेर जायला निघाले तेव्हां धन्ना त्यांस म्हणाला 'महाराज मला तुमचा देवबाप्पा पाहिजे. मीही त्याची पूजा रोज करीन.'

"काय ? तुला कशाला पाहिजे. देवबाप्पा ! तूं काय करणार आहेस ? पंडितजींनें विचारलें.

'वा ! मी त्याची तुमच्याप्रमाणें पूजा करीन. देवाला खाऊ देईन !' धन्ना म्हणाला.

'अरे! तूं किती लहान आहेस? तूं कसली पूजा करणार? तुला काय समजतें आहे रे!'

'नको समजूं द्या. मला तुमचा देवबाप्पा पाहिजे ! मी तुम्हांला येथून जावं देणार नाहीं आणि मला सांगा कीं, माझ्यासारख्या लहान मुलानें देवाची पूजा केलेलें त्याला आवडणार नाहीं का ?' धन्ना म्हणाला.

'तसें नाहीं रे ! ध्रुव, प्रल्हाद हे तरी काय, तुझ्यासारखे लहान मुलेच होते. त्यांची पूजा देवानें स्वीकारलीच कीं नाहीं ?'

'तें कांहीं नाहीं; मला देवबाप्पा पाहिजे. मी घेतल्याशिवाय सोडणार नाहीं!'

पंडीतजीचा निरुपाय झाला. काय करावें सुचेना. सारे हट्ट पुरवले परंतु बाळ हट्ट महाकठीण! तो पुरविल्याशिवाय गत्यंतर नसतें. लहान मुलाची समजूत कशी घालायची? ती घालतांच येत नाहीं. मग काय करायचें? पंडितजींनीं एक तोड शोधून काढली. त्यांच्याजवळ पानसुपारी कुटण्याचा खलबत्ता होता. त्या कुटण्याचा दगडी दांडा होता. त्यालाच देवबाप्पा बनवून तो टाकावा देऊन या मुलाला म्हणजे झालें. कुटणें काय, आपणास दुसरें घेतां येईल. रोजच्या पूजेचा शाळिग्राम कसा द्यायचा?

विचार मोठा पोक्त होता. त्याची अंमलबजावणी करण्याच्या हेतूनें पंडीतजींनीं पोतडयांतून खलबत्त्याचें कुटणें हळूच काढलें व तें त्या मुलापुढें करून म्हणाले, 'हा घे देवबाप्पा! तुझ्यासाठीं मुद्दाम आणिला आहे. आहे कीं नाहीं देवबाप्पा?'

'होय; पण हा तुमच्या देवबाप्पापेक्षां मोठा आहे नाहीं का?'

"असला म्हणून काय झालें! तो माझ्या प्रवासांतील देवबाप्पा! तूं कांहीं प्रवासास जाणार नाहींस. मात्र आतां एक गोष्ट लक्षांत ठेव. रोज स्नान केल्यानंतर या देवबाप्पाला स्नान घालून पुसायचें. त्याला ताम्हनांत ठेवायचें; त्यावर पांच फुलें घालायचीं, नमस्कार करायचा आणि मग आपण अन्न ग्रहण करण्यापूर्वीं घरांत जी कांहीं भाजीभाकर असेल ती थाळींतून या देवबाप्पापुढें ठेवायची; आणि महाराज! ही आमची भाजीभाकर आपण स्वीकारा; असें हात जोडून सांगायचें व नंतरच स्वतः भोजन करायचें."

याप्रमाणें सूचना करून पंडीतजी आपल्या गांवीं निघून गेले.

× × ×

दुसऱ्या दिवशीं धन्ना दुपारच्या प्रहरीं शेतवाडीवरून आला व आल्याबरोबर त्यानें स्नान आटोपलें. पंडीतजीकडून मागून घेतलेलें दैवत त्यानें एका पडताळांत संभाळून ठेविलें होतें. त्याला बाहेर काढून स्नान घातलें व येतांना ५–६ फुलें बरोबर आणिली होतीं. तीं देवबाप्पाला भक्तिभावपूर्वक वाहून साष्टांग प्रणिपात घातला.

आईनें एका थाळ्यांत त्यांच्यासाठीं दोन बाजरीच्या भाकऱ्या व भाजी दिली होती. ती त्यानें देवापुढें ठेविली व हात जोडून प्रार्थनापूर्वक म्हणाला, 'महाराज! हं; आतां आपण भोजन करावें.'

याप्रमाणें मनोभावें विनंती करून धन्ना तटस्थतेनें पहात राहिला. त्याला वाटलें होतें कीं, ज्याची आपण पूजाअर्चा केली तो देवबाप्पा थाळींतील थोडीथोडी भाकर खाईल व मग उरलेली प्रसाद म्हणून आपण खाऊं; परंतु तसें कांहींच घडलें नाहीं. भाकऱ्या जागच्याजागीं होत्या.

धन्ना हा पक्का जाट होता. आपला निर्धार पूर्ण केल्याशिवाय तो स्वस्थ रहाणार नाहीं. त्यानें देवाला बजावलें कीं, आपण भाकर खाल्ल्याशिवाय मी तिला हात लावणार नाहीं.

तरीहि भाजीभाकर जागच्याजागीं. बराच वेळ वाट पाहून शेवटीं निराशेनें ती थाळी धन्नानें गाईपुढें नेऊन ठेविली व आपण उपाशी राहिला. दुसऱ्यादिवशींहि तोच प्रकार. असें एक दोन नव्हे सात दिवस मागें पडले. धन्नाच्या आईला वाटायचें कीं आपल्या खोलींत बसून धन्ना भाजीभाकर खात असेल; परंतु देव खात नाहीं मग आपणहि खायचं नाहीं, असा धन्नाचा पक्का निर्धार झालेला होता.

भगवान धन्नाचा भावीकपणा कसोटीला लावून पहात होता. सात दिवस धन्ना उपवासी होता. त्याचें अंतःकरण शुद्ध होतें. भोळ्या भक्तिभावाशिवाय तेथें दुसऱ्या कसल्याही विकारास जागा नव्हती. अशा या धन्नासाठीं देव तळमळत होता.

आठव्या दिवशीं पुन्हां नेहमींप्रमाणें धन्नानें आपल्या देव बाप्पाची पूजा भक्तिभावानें केली व जेवणाची थाळी आणून त्याच्यापुढें ठेविली. त्या देवानें पाहिलें कीं, असें कितीहि दिवस गेले तरी धन्नाचा निर्धार कांहीं केल्या बदलणार नाहीं. प्राण जाईपर्यंत तो असेंच करीत राहील.

देवानें बालरूप धारण केलें व धन्नाच्या पुढ्यांत आसन ठोकलें. धन्नाला आनंद झाला. तो म्हणाला, " देवा! सात दिवस तूं होतास तरी कुठें? सात दिवस माझी कां बरं उपासमार केलीस?"

'तसें नाहीं रे धन्ना! माझी तब्बेत ठीक नव्हती. माझें डोकें सारखें ठणकत होतें! आतां बरें आहे!' असें म्हणून देवानें भाकरीचा तुकडा मोडून खायला सुरुवात केली.

देव भावाचा भुकेला! जेथें भोळा, निर्मळ भाव दिसेल तेथें देव असायचा. तो कोणाची विद्वत्ता किंवा पांडित्य पहात नाहीं. पांडित्यापासून तो चार पावलें दूर रहातो. याचें काय बरें कारण? याचें कारण विद्वानांचें मन शंकाकुशंकांनीं व्यापलेलें असतें. ते र्कवितर्काच्या जाळ्यांत अडकलेले असतात व त्यांना शाब्दिक पांडित्य आवडतें. जेथें भक्तिभाव, खरें ज्ञान व निर्धार यांचें वास्तव्य असतें, जेथें दृढ श्रद्धा, निष्ठा यांचें वास्तव्य आहे तेथेंच देवाचें वास्तव्य असतें.

× × ×

भगवंतानें एक भाकर संपविली व दुसरीला हात लावणार तोंच धन्ना म्हणाला "देवा! एक भाकर पुरी नाहीं का झाली तुला? दुसरी खाऊन टाकलीस मग मी रे काय खाऊं? आम्हीं गरीब आहोंत. माझी आई चार भाकऱ्या करते. दोन माझ्यासाठीं व दोन तिच्यासाठीं. माझ्या भाकरींचा मी तुला नैवेद्य दाखवितों, त्या दोन्हीं भाकऱ्या तूं खाऊन टाकल्यास मग मला काय!"

"खरंच; मला आठवण नाहीं राहिली रे! खा बरं ही दुसरी भाकर तूं. माझें पोट भरलें."

घन्ना हळूहळु भाकर खाऊं लागला. सात दिवसांचा उपवासी घन्ना! किती भोळें भाबडें व निर्मळ अंतःकरण होतें त्याचें!

बाल स्वरूपांत प्रगट झालेले देवबाप्पा त्याच्याकडे माऊलीच्या ममतेनें पहात बसले होते. घन्नानें आपल्या भोळ्या भक्तीच्या बळावर भगवंताला जिंकलें होतें. भगवंत घन्नाचा दास बनला होता.

भाकर खाऊन संपली आणि घन्नानें पाणी पिऊन तृप्तीचा ढेकर दिला. देवबाबा पुढ्यांत बसलेला! त्याला पाहून घन्ना म्हणाला, 'झालं ना काम? आतां कशाला बसला आहेस इथं? आतां जा आपल्या घरीं. उद्यां याचवेळीं माझ्यासंगती भाकर खायला ये बरं! विसरूं नकोस!'

'घन्ना! मी निहायत खूष आहें तुझ्यावर! कांहींतरी माग ना माझ्याकडे! तुझें कल्याण व्हावें व तूं सुखी व्हावेंस असं मला फार वाटतें!' देव म्हणाला.

'काय मागूं? समजत नाहीं मला. मी लहान आहें. मला दिवसभर पोटासाठीं शेतांत राबावें लागतें. मला एखाद्या नोकराचाकराचा सहकार मिळाल्यास बरें. पण मी त्याला पगार कोठून देणार? मला एखादा नोकर पाहिजे. तो माझ्याबरोबर जेवील खाईल. पण त्यानें पगाराची मात्र अपेक्षा करूं नये.'

भगवंताला विचार पडला. बीन पगारी राबणारा कोण नोकर मिळूं शकणार? ती कामगिरी मीच स्वतःवर घ्यावी तर! दुसरा कांहीं मार्ग दिसत नाहीं. राजा दशरथानें भगवंताला आपल्या भक्तीनें प्रसन्न करून घेतला होता. देव प्रसन्न झाला तेव्हां दशरथानें देवाला प्रार्थना केली कीं मला देवा तुमच्यासारखा पुत्र पाहिजे. देवासारखा पुत्र म्हणजे देवच. दुसरा कोण असूं शकणार? देवानें दशरथाची इच्छा पूर्ण केली.

देवानें अशा रीतीनें स्वतःशीं विचार करून शेवटीं उत्तर दिलें कीं "ठीक आहे! असा एक स्वयंसेवक तुझ्याशीं तुझ्या कामकाजांत सहकार द्यायला उद्यांपसून हजर होईन, मग झालं ना?"

× × ×

पांच वर्षांचा कालावधी हां हां म्हणतां मागें पडला. घन्नाला भगवंतरुपी स्वयंसेवकाचा संपूर्ण सहकार लाभला होता. त्याचें ऐश्वर्य उत्तरोत्तर वृद्धिंगत होत चाललें होतें. ज्या पंडितजींनीं पांच वर्षांपूर्वी घन्नाला देवबाप्पा म्हणून खलबत्त्याचें कुटणें दिलें होतें ते पंडितजी एके रात्रीं भटकत भटकत घन्नाच्या घरीं येऊन दाखल झाले. रात्रीचा प्रहर. सर्वत्र सामसूम झालें होतें. पंडितजी बाहेरच्या ओसरीवर अंथरूण पसरून झोपले. सकाळीं उठून पहातात तों पंडितजीला आश्चर्याचा धक्का बसला. ज्या घन्नाला आपण देवबाप्पा म्हणून कांहींतरी दिलें; तो आतां कर्तासवरता सतरा वर्षांचा तरुण उत्साहानें घरांतील व्यवहार पहात आहे. घन्नानेंहि पंडितजीला ओळखलें. त्याच्या त्या देणगीमुळें आपल्या

वाट्याला वैभवश्री आली याची जाणीव त्याला होती. त्यानें कृतज्ञतापूर्वक पंडितजीला साष्टांग प्रणिपात केला.

घन्नाला वर उठवून व जवळ बसवून पंडितजी म्हणाले, "कसं काय? ठीक आहे ना? ठीक तर दिसतंय सारं!"

"होय; पंडितजी सर्व कांहीं ठीक आहे. मी आनंदांत आहे. पांच वर्षांपूर्वी आपण आलां तेव्हां आम्हीं दारिद्र्यानें पिडलेले होतों. आपणास भोजन करण्यासाठीं मूठभर तांदूळ देण्याची ताकद नव्हती आम्हांला! इतकें वाईट वाटलं आहे त्यामुळें!"

"मग आतां? आतां ठीक आहे ना?"

"अहो! ठीक म्हणून काय विचारतां? फारच चांगलें आहे? ती समोरची तीन मजली इमारत माझी आहे. खालच्या मजल्यावर धान्याचीं भरलेलीं कोठारें आहेत. तें बाजुला दिसतें तें माझ्या देवबाप्पाचें मंदिर! त्यांतच तुम्हीं मला दिलेल्या देवबाप्पाची स्थापना केली आहे. तो समोर सुंदर तलाव व त्यांत फुललेलीं तीं सुंदर कमळें! माझी शेतीवाडी आतां खूप वाढली आहे. भरपूर धान्य पिकतें आणि एकंदरींत आबादीआबाद आहे!'

'अरे होय! परंतु हें सारें स्थित्यंतर घडून आलें कसें तें तरी सांग!'

'आज धनधान्याची टंचाई मला मुळींच भासत नाहीं. धनधान्य, दूधदुभतें; जमीन जुमला, गुरेंढोरें माझ्या वाट्याला भरपूर आलेलीं आहेत. मला उणीव म्हणून कललीही भासत नाहीं.'

'अरे होय; पण हें सारें घडून आलें कसें तें सांगशील कीं नाहीं?'

'महाराज! काय सांगूं? हें सारें आपल्या कृपेचें फळ आहे. आपले माझ्या शिरावर अगणित उपकार झाले आहेत!'

'माझी कसली कृपा? माझ्यापाशीं कृपा प्रसाद असता तर मी स्वतःसाठीं नाहीं का त्याचा फायदा करून घेतला असता? ही किमया कोणी घडवून आणली तें तरी सांग मला!'

'सांगूं? नाहीं समजूं शकला आपण? अहो! तुम्हींच नाहीं का मला 'देवबाप्पा' देऊन गेलां होतां? त्यानेंच जादूची कांडी फिरविली!'

× × × ×

हें गौडबंगाल काय आहे, त्याचा कांहींच उलगडा पंडितजीला होईना. खरंच आहे तें! पांडित्यानें किंवा विद्वत्तेनें या गांठी सुटण्यासारख्या नसतात. ही भक्तिभावाची, श्रद्धेची बाब आहे. तिचा लवलेशही जेथें नाहीं; तेथें समज पडण्याच्या दृष्टीनें ठणठणाट व्हावा हें अगदीं स्वाभाविक होतें.

पंडीतजीची उत्कंठा वाढलेली होती. तो बेचैन झालेला होता. त्यानें खोदखोदून घन्नाला नाना प्रश्न विचारले.

मग घडलेली सारी हकीगत धन्नानें पंडीतजीला सांगितली. सात दिवसांच्या उपवासानंतर आठव्या दिवशीं प्रसन्न होऊन थाळींतील एक भाकर देवपाप्पानें कशी खाल्ली व आपणाला कसून काम करणारा एक धडधाकट स्वयंसेवक, आपल्या मागणी प्रमाणें कसा दिला आहे व त्याच्या सहकारामुळें प्रतीवर्षी आपण प्रगतीचीं पावलें टाकींत कसें मार्ग क्रमण चालविलें आहे त्याची जाणीव करून दिली.

आतां कुठें पंडीतजीच्या डोक्यांत प्रकाश किरण चमकूं लागले. विश्वास ! श्रद्धा !! हे संजीवन देणारे शब्द त्याच्या मनांत आतां कुठें घोळूं लागले.

'खरंच का रे हें सारें ? आणि तुझ्याबरोबर सतत राबणारा व तुझ्या घरींदारीं समृद्धीची गंगा वहाविणारा तुझा तो '**स्वयंसेवक**' मला पहायला मिळेल का रे ? मला भेटावेंसें वाटतें त्याला !' अगदीं काकुळतीला येऊन पंडीतजी बोलत होते.

'कां नाहीं पहायला मिळणार ? थोडे श्रम घ्यावे लागतील आपल्याला. मी मात्र बरोबर येऊं शकणार नाहीं. कांहीं जरुरीच्या कामानिमित्त येथले गांवकरी मला भेटायला येणार आहेत. तुम्हांला त्याचा बरोबर ठावठिकाणा सांगतों. त्याचें नाव आहे भगवाना; ही पहा; समोर पायवाट दिसते ना; त्या वाटेनें सरळ जायचें. रस्त्याच्या कडेला एक झोपडी लागेल. तिच्या आसपास कुठें तरी किंवा मोटेजवळ काम करीत असतां आमचा भगवाना तुमच्या दृष्टीस पडेल.

पंडीतजी सांगितलेल्या वाटेनें धांवत सुटले. धन्नाला भाग्यश्रीची जोड करून देणाऱ्या भगवानास केव्हां पाहीन असें त्यांना झालें होतें. झोपडी पाहिली; विहिरीवर मोट चालू होती; परंतु भगवाना चौफेर पाहूनही त्यांना दिसला नाहीं. हांका मारून पाहिल्या तरीही ओ मिळाला नाहीं. कसा मिळेल. वाटेल त्याच्या हांकेला ओ द्यायला भगवाना काय वाटेवर पडला आहे ! तो हांक ऐकतो; परंतु कोणाची ? भक्तिभावानें, निःस्वार्थ व शुद्ध प्रेमानें मारलेल्या हांकेला तो ओ देतो.

× × × ×

पंडीतजी निराश होऊन घरीं आले. धन्नाला उद्देशून म्हणाले, 'काय रे लोणकढी थाप मारलीस ? कुठें आहे तुझा भगवाना ? मी किती किती शोधलें; हांकावर हांका मारल्या. कोणीही आढळलें नाहीं मला !'

'खरंच का असें झालें ? मग तो येथून जवळच आमच्या शेतांत गव्हाची पेरणी चालू आहे तिकडे गेला असेल !'

'कुठें आहे तुझें गव्हाचें शेत ? तेथें जाऊन पाहून येतों.'

'या घराच्या मागील वाटेनें आपण गेलां म्हणजे तेथें आढळून येईल तुम्हांला. फार लांब नाहीं.'

पंडीतजींनीं गव्हाचें शेत शोधून काढलें. गव्हांची पेरणी नुकतीच झालेली होती; परंतु तेथें भगवाना नव्हता.

परत निराशेनें पंडीतजी धन्नाकडे आले. काकुळतीला येऊन म्हणाले कसेंही करून मला तुझ्या भगवानाची भेट घडवून दे. त्याशिवाय मी येथून जाणार नाहीं!'

धन्नापुढें पेंचप्रसंग निर्माण झाला. तो म्हणाला, 'असें काय करतां! आजवर तुमची आणि भगवंताची भेट कधीं झालीच नाहीं का?'

'नाहीं रे नाहीं!'

'मग काय त्याला भोजनाचा नैवेद्य कधीं दाखवीत नव्हता का !'

'नैवेद्य दाखवितों; परंतु तो कुठें काय खातो आहे? मीच खायचा.'

'भगवान नाहीं खात तोंपर्यंत आपणही नाहीं खायचें हा प्रयोग कधीं करून पाहिला होता का?

'नाहीं रे बाबा! तो प्रयोग करून पहाण्याचें माझ्या डोक्यांत कधींच आले नाहीं!

'बरें आहे तर! माझा भगवाना रात्रौ ८।९ वाजतां शेतावरील कामकाज संपवून येईल; माझ्याबरोबर भोजन करून तो झोपतो व पहांटे उठून परत आपल्या शेतीच्या कामावर जातो. मी तुमची व त्याची आज जरूर भेट घडवून आणीन.'

'माझ्यासाठीं कृपा करून जरूर तेवढें कर.'

× × ×

भोजनोत्तर झोपी जाण्यापूर्वी भगवानाच्या खोलींत जाऊन धन्ना हात जोडून म्हणाला, 'माझे गुरुजी आले आहेत. त्यांना आपली भेट घेण्याची इच्छा आहे.'

'इच्छा असली तरी त्यांना माझी भेट होऊं शकणार नाहीं.'

'आतां यावेळीं शक्य नसलें तरी नंतर केव्हां द्याल?'

'केव्हांही नाहीं!'

'असें काय बरें? ते माझ्यामागें एकसारखे लागले आहेत. कां बरें त्याना भेटणार नाहीं?'

'ते मोठे पंडीत आहेत. पांडित्याचें आणि माझें वाकडें आहे!'

'कां बरें? विद्वान, पंडीत आवडत नाहींत कां? असें कां?

'पंडीत म्हटल्याबरोबर माझें रक्त उसळतें! त्यांच्या त्या शंका कुशंका, 'जर आणि तर आणि परंतु! मला नाही तें पसंत!'

'त्यांनीं भोजन करण्याचें सोडून दिलें तर?'

'तरीही नाहीं. अरे! धन्ना आणि पंडीतजी यांमध्यें जमीन अस्मानाचें अंतर आहे.'

'माझ्यासाठीं त्यांना एक क्षणभर तरी दर्शन द्यावें. मी त्यांना गुरु मानतों. माझी पाठ ते सोडीनात; यामुळें दर्शन घडविण्याचें मी त्यांना वचन देऊन चुकलों आहे!'

# माणुसकीची मातब्बरी

***************************

**माणुसकी—मानवता हा बहुमोल गुण आहे. माणुसकी आणि देवत्त्व हीं एकमेकांपासून भिन्न नाहींत. देवत्त्वाप्रत घेऊन जाणारी माणुसकी ही खंबीर शिडी आहे; परंतु त्या माणुसकीला आम्हीं पायांखालीं तुडवीत आहोंत. तिला पारखे झालेले आहोंत. अशा या माणुसकीचें महत्त्व, तिचे फायदे व ती आचरणांत कशी आणावी; याची अल्पशी जाणीव या लेखांत झाली तरी लेखकास सार्थक झाल्यासारखें वाटेल.**

आजकाल जिकडे पहावें तिकडे माणुसकीचा अभाव दिसून येत आहे. ज्याच्याठायीं 'माणुसकी' नाहीं तो मानव कसला? माणुसकी हा मानवाचा बहुमोल अलंकार आहे; परंतु जिकडे पहावें तिकडे पाशवी वृत्तीचा थयथयाट दिसून येत आहे. परस्परांत प्रेमभाव नाहीं; एकमेकांबद्दल सहानुभूती नाहीं. केवळ स्वतःच्या स्वार्थासाठीं वाटेल तें करण्याची तयारी! किती अधोगति आहे ही मानवांची! परस्पर प्रेम, सहानुभूति, सत्य, प्रेम, बंधुभाव यांच्यासारख्या माणसाला शोभविणाऱ्या सद्गुणांची जागा परस्पर द्वेष, मत्सर, स्वार्थ व कठोरपणा या दुर्गुणांनीं घेतलेली आहे.

**प्रथम स्वतःचा विकास**

सध्यां विकासयुग सुरू होत आहे. प्रथम आपल्या मनाचें, अंतःकरणाचें विकसन झालें पाहिजे. तें व्हावें यासाठीं सतत झटून प्रयत्न केले पाहिजेत. प्रयत्नसाध्य नाहीं अशी या जगांत एकहि गोष्ट नाहीं. परंतु आपला विकास केव्हां होणार? त्याकडे आपण पूर्ण लक्ष लावूं तेव्हांच कीं नाहीं! आपण स्वतःच्या विकासासाठीं झटलें पाहिजे, त्याचप्रमाणें इतरेजनांच्या विकासासाठींहि तत्परतेनें झटलें पाहिजे. हीच सर्वांत मोठी मानवसेवा आहे पाशवी वृत्तीपासून जितकी लौकर सुटका करून घेतां येईल

---

'तुझा, माझ्या भक्ताचा शब्द खालीं पडूं नये म्हणून एकच क्षणभर मी त्याला दर्शन देईन; आणि तेंही उद्यां मध्यरात्रीं.'

त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं दर्शनोत्सुक पंडीतजी मांडी ठोकून वाट पहात बसले. मध्यरात्र उलटतांच हातीं गदा, शंख पद्मधारी श्री विष्णू एकाएकीं पंडीतजी पुढें प्रगट झाले. पंडितजींनीं खालीं मान वाकवून हात जोडले व वर पहातात तों तेथें कोणी नव्हतें.

दुसऱ्या दिवशीं उजाडतांच धन्नाची भेट झाली तेव्हां भाग्यशाली धन्नाला धन्यवाद देत पंडीतजींनीं त्याचा निरोप घेतला. त्याच्या डोक्यांत आतां कुठें प्रकाश पडला होता! परंतु धन्ना तो धन्ना व पंडीतजी ते पंडीतजीच!

---

तितकी करून घेण्यासाठीं हें आपलें पहिलें परम कर्तव्य आहे. मानवत्व आणि देवत्व यांचा परस्पर अत्यंत निकट संबंध आहे. मानवता म्हणजेच देवत्त्व. देवत्त्वाकडे जाण्याची सर्वांत मोठी व खात्रीची शिडी जर कोणती असेल तर ती म्हणजे मानवता हीच होय. तेव्हां तिच्या प्राप्तीसाठीं, ती आचरणांत यावी म्हणून झटणें हें आपलें आद्य कर्तव्य होय.

**आपण सर्व भगवंताचीं लेकरें**

आपल्या घरांत काय किंवा समाजांत काय, खोट्यानाट्या कल्पना, अंधविश्वास, द्वेष-भावना, मत्सर यासारख्या दुर्गुणांचें पीक आलेलें आहे. तें नाहींसें करण्यासाठीं झटलें पाहिजे. आपण अज्ञान पंकांत रुतलेले आहोंत. त्यामुळें नाना प्रकारच्या आकुंचित भावना आपल्यांत वास करीत आहेत. त्या नाहींशा व्हाव्या यासाठीं लोकांना समजून देणें, तशाप्रकारचें शिक्षण देणें फार जरूरीचें आहे. जेणेंकरून आपल्यांत बंधूभाव, परस्परप्रेम, त्यागबुद्धि, समता, सहकारिता, सहानुभूति यासारख्या सद्गुणांची मातब्बरी सर्वांना समजेल यासाठीं भागाभागांतून व गल्लीगल्लींतून, गावांगावांतून सतत प्रयत्न झाले पाहिजेत. आम्हीं एक-मेकांपासून फटकून वागण्यांत मोठे पटाईत आहोंत. भावनाशून्यता म्हणतात ती आमच्याठायीं ओतप्रोत भरलेली आहे. भगवंतानें आपणा सर्वांस निर्माण केलें आहे. तो आपला पिता आहे. आपण सर्व त्यांचीं लेकरें आहोंत. आम्हीं एकमेकांशीं बंधुभावानें व प्रेमानें वागावें, एकमेकाशीं सहकार्य करून आपलें कल्याण करून घ्यावें; असा ईश्वरी संकेत आहे. परंतु तो आहे का कोणाच्या गांवीं ?

**अत्याचार, अनाचार व अविचार**

आपल्या ठायीं 'मानवता' कशी बरें निर्माण होईल ? आपल्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक विकासाआड येणाऱ्या कितीतरी गोष्टी आहेत. त्या प्रयत्नशील होऊन दूर करण्यासाठीं झटलें पाहिजे. आपल्यामध्यें अत्याचार, अनाचार व अविचार यांचें भयंकर पीक माजलेलें आहे. हे तिन्हीं मानवतेचे महान शत्रु आहेत. त्यांच्याशीं सामना देण्याचा निर्धार करून त्यांना संधी मिळेल तेथें फोडून काढणें हें आपलें कर्तव्य आपण डोळ्यांत तेल घालून पाळत केलें पाहिजे.

आपण आपल्या दृष्टीसमोर उच्च अशा भारतीय संस्कृतीचा अनुकरणीय आदर्श ठेविला पाहिजे. तो आदर्श कोणता माहीत आहे ? सर्वांनीं सुखी, समाधानी व आनंदी व्हावें व रहावें सर्वांना सुशिक्षण, प्रकाश व सुसंपन्नता प्राप्त व्हावी. सर्वांच्या गरजा पूर्ण केल्या जाव्या. सर्वे सुखिन; सन्तु ! किती उच्च आहे हा आदर्श ! पाश्चात्य संस्कृति ही दिसायला सुंदर असली तरी ती माणुसकीला जितकें द्यावें तितकें महत्त्व देत नाहीं. निदान आचरणांत तरी ती भावना येत असलेली दिसत नाहीं.

**मेणाहून मऊ असावें**

मनुष्याचें हृदय संवेदनाशील व भावनासंपन्न असावें. तें मेणाहून मऊ असावें. दगडाप्रमाणें कठीण असूं नये. जो दुसऱ्याचें दुःख पाहून दुःखी होतो व तें दूर करण्या-

साठीं झटतो, ज्याला दुसऱ्याचा आनंद पाहून आनंद होतो व दुःख पाहून जो दुःखी होतो तो धन्य होय. कारण मानवतेचा त्याच्या ठिकाणीं उदय झालेला असतो. अनाथांचें दुःख, विधवांच्या हालअपेष्टा, दलितांचें अज्ञान, सभोंवार चाललेली लूटमार, ठकबाजी, रक्तशोषण वगैरे सैतानी प्रकार पाहून ज्याचें हृदय तळमळत नाहीं व ज्याला आपल्या कर्तव्याची जाणीव होत नाहीं तो कसला माणूस !

आपल्या ठायीं मानवतेची उत्तरोत्तर वृद्धि होत गेली पाहिजे. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह हीं त्या वृद्धीचीं पांच साधनें आहेत. मानवतेचें हें पंचामृत आहे. तसेंच शौच, संतोष, तप, स्वाध्याय व ईशभक्ति हींही त्याच मार्गांत पोषक होणारीं बहुमोल साधनें आहेत. हे आतां सांगितलेले शब्द किती साधे व सुटसुटीत आहेत नाहीं का ? परंतु त्यांचें आचरण करणें वाटतें तेवढें सुलभ नाहीं. फार कठीण आहे तो मामला ! परंतु म्हणून तो सोडून द्यायचा कां ? आपल्या विकासास, उन्नतीस व मानवतेस सर्वस्वी पोषक होणाऱ्या त्या गुणांचा आपण विचार व आचार करण्यासाठीं निरंतर उद्यमशील झालें पाहिजे. त्यासंबंधीं जागृत राहून त्या गुणांचा ध्यास घेतला पाहिजे.

## गरजा कमीत कमी असाव्या

आमच्या गरजा आम्हीं शक्य तेवढ्या कमी कमी करण्याकडे लक्ष पुरविलें पाहिजे. आपण त्या ऐवजीं स्वतःच्या आवश्यकतांचें केवढें अवडंबर माजवून ठेविलें आहे बरें ? गरजा वाढल्या म्हणजे दुसऱ्यांच्या हितसंबंधांवर आक्रमण करण्याची बुद्धी होते. स्वतःपेक्षां दुसऱ्याच्या गरजा कशा भागवितां येतील, आपण दुसऱ्याच्या उपयोगी कसे पडूं ही दृष्टी आपल्या ठायीं निर्माण झाली पाहिजे. त्याचा अर्थ हाच कीं, स्वार्थाची जागा परमार्थानें घेतली पाहिजे, स्वतःच्या गरजांबरोबर किंवा त्याहीपेक्षां इतरे जनांच्या गरजांकडे लक्ष पुरविण्याची परोपकार दृष्टी आपल्यांत आली पाहिजे.

सध्यां आपलें काय बरें चाललें आहे ? अत्यंत तुच्छ असा जो स्वार्थ तोच नेमका आमचा सगासोयरा झालेला आहे. अमूक वस्तू मलाच जास्तींत जास्त मिळाली पाहिजे, अधिकांत अधिक हिस्सा मी बळकाविणार, दुसऱ्यांना कांहींएक घेऊं न देतां त्यांतच आनंद व समाधान मानून रहाणार, प्रथम माझ्या सर्व गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत, त्यानंतर इतरांचें कांहींही होवो ! या दुष्ट भावना आम्हांला ग्रासून राहिल्या आहेत. त्यांच्या मगरमिठींतून आम्हीं आमची सुटका करून घेतली पाहिजे.

## दुष्ट भावनांचा त्याग

अभिलाषा, अपहारवृत्ति व हांव या दुष्ट भावना आहेत. आपण त्यापासून दूर राहिलें पाहिजे, अहो ! स्वार्थ कशासाठीं करावयाचा ? आपल्या संगती काय येत आहे ! 'मला त्याची जरुरी नाहीं; आपण खुशाल घ्या ! अशी आपली वृत्ति असावी. ज्याची अशाप्रकारची निःस्वार्थ वृत्ति असते त्याचें घर धुंडीत त्याच्या

घरीं लक्ष्मी येत असते. आपली दृष्टी निर्मळ न्यायाची असावी. जें न्यायानें आपलें असेल तेंच आपण स्वीकारावें. अन्यायानें कांहीं स्वीकारूं नये. मन कसें उदार असावें. थोडक्यांत समाधान मानून घेण्याची वृत्ति असावी.

मला नको. आपण घ्या ही वृत्ति आपल्यांत बळावत गेली पाहिजे. तीच शेवटीं आपल्या कल्याणास कारण होणारी आहे. मानव्याचें रक्षण व विकास अशा प्रकारच्या भावनेवर अवलंबून आहे.

प्राचीन काळापासून इतिहास आपण वर वर अवलोकन केला तरी हीच गोष्ट आपणास आढळून येईल. 'मी सर्व घेईन; आपणांस कांहीं एक घेऊं देणार नाहीं. या स्वार्थी वृत्तीनें घराण्याचा, समाजाचा व राष्ट्राचा सत्यानाश झालेला आहे. रामायण काळांत कैकयी या स्वार्थी वृत्तीची पुरस्कर्ती होती. तिच्या त्या वृत्तीमुळें अयोध्यावासी जनतेवर व तिच्या घराण्यावर कशी आपत्ति ओढवली हें काय आपण जाणत नाहीं ? राजा दशरथाचा त्या वृत्तीपायीं प्राण गेला आणि श्रीरामचंद्राला चौदा वर्षे वनवास घडला. या घटनांचे दुष्परिणाम किती दूरवर पोहोंचणारे होते बरें !

## कैकयीचा स्वार्थ व भरताचा त्याग

परंतु भरतानें काय केलें पहा ! 'मला नको ! आपणच त्याचा स्वीकार करा !' ही भरतवृत्ति होती. त्यामुळें काय झालें ? श्रीरामचंद्रानें वनवासास निघतांना भरतानें राज्याचा स्वीकार करून सारा राज्यकारभार चालवावा असा आदेश दिला ! सीतादेवीनेंहि सुखसर्वस्वाचा त्याग करून तिनेही त्यागाचा, वनवासाच मार्ग स्वेच्छेनें स्वीकारला. तोच त्यागाचा संचार लक्ष्मणाची पत्नी सुमित्रा देवींत झाला व तिनें लक्ष्मणाला श्रीरामचंद्रा-बरोबर वनवासांत जाण्याची परवानगी दिली.

परंतु भरतानें त्या राज्याचा व आपल्याकडे चालून आलेल्या सुखोपभोगाचा स्वीकार केला काय ? नाहीं, त्यानें त्या सर्व गोष्टींकडे पाठ फिरविली, त्यानें राजवैभवावर लाथ मारिली व बालकाप्रमाणें रडत रडत तो म्हणाला, 'नाहीं ! नाहीं ! हें राजवैभव माझ्यासाठीं नसून तें प्रभू रामचंद्रासाठीं आहे. मी त्याचा स्वीकार करणार नाहीं. मला तें नको !'

स्वतःच्या सुखाची व चैनीची पर्वा न करतां दुसऱ्याच्या सुखाकडे पहावयाचें ही वृत्तीच मनुष्याचें कल्याण करणारी आहे. तुम्हांला कोणतीहि गोष्ट पाहिजे असेल तर तिची हांव न बाळगतां तिच्याबाबतींत बेफिकीर राहिल्यानें व तिचा त्याग केल्यानेंच आपणांस तिची प्राप्ती होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

## या सोनेरी नियमाचें महत्त्व

दुसऱ्याच्या विकासासाठीं, उन्नतीसाठीं व सुखसमाधानासाठीं अहर्निश झटावयाचें हा सोनेरी नियम आहे. घरांत, समाजांत व देशांत आणि देशोदेशीं समाधान सुख व शांतता नांदण्यास कारणीभूत होणारा असा सोनेरी नियम आहे.

'मी घेईन,' 'मी बळकावीन' असें म्हणण्याऐवजीं मी स्वेच्छेनें देईन, मी अभिलाषा बाळगणार नाहीं ही वृत्ती दैवी नाहीं असें कोण म्हणेल! जेथें माणुसकी वास करीत असते तेथेंच ही वृत्ति संभवते. आणि अशी माणुसकी जेथें आहे तेथें देवाचें वास्तव्य आहे असें खुशाल समजावें.

या जगांत ईश्वरानें आपणास मानवाचा जन्म दिला, तो कशासाठीं बरें! आपसांत झगडण्यासाठीं, दुसऱ्याचें लुटून स्वतःचें घर भरण्यासाठीं कीं एकमेकांत बंधुभावानें वागून एकमेकांसाठीं झटण्यासाठीं! 'मला नको तुला घे' ही वृत्ति आपण अधिकाधिक अंमलांत आणण्यासाठीं झटलें पाहिजे. आम्हीं ही वृत्ति स्वतःच्या आचरणांत आणावीच परंतु इतरांनाही त्या वृत्तीचें महत्त्व समजून त्यांच्याही आचरणांत ती येत जाईल यासाठीं आपण नेहमीं झटत राहिलें पाहिजे.

**हीच बाबांची शिकवण**

साधुसंतांच्या शिकवणुकींचें हेंच सार सर्वस्व आहे. श्रीसाई बाबांची सारी शिकवण माणुसकीवर आधारलेली आहे, हें आपणास नव्यानें का सांगितलें पाहिजे? साईबाबांची भक्ति करणें म्हणजे माणसुकीचें आचरण करणें. आम्हीं साईबाबांचे खरेखुरे भक्त केव्हां होऊ? माणुसकिचें मर्म ओळखून तिचें आचरण इमानें इतबारें आमच्याकडून घडत जाईल तेव्हांच. श्री साई बाबांना प्रसन्न करून घेण्याचा हाच राजमार्ग आहे.




# लहान मुलाच्या आंकडीवर

## जुनें आणि प्रसिद्ध औषध

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

**कांचनलाला वाडीलाल कं.** — दवाबझार, मुंबई २.




## बाबांची अतर्क्य लीला

**श्री.** डी. सुब्बराव (२३०, शहा स्टोअर्स, आनंद निवास, मांगलवाडी मुंबई नं. ४) हे प्रथमच नोव्हेंबर १९५१ मध्यें शिर्डीस श्रीसाईबाबांच्या दर्शनास आले. याबाबतींत त्यांनीं सांगितलेला अनुभव मोठा विलक्षण व आश्चर्यकारक आहे.

हे गृहस्थ शहा स्टोअर्समध्यें शिंप्याचें काम करतात. घरची स्थिति अत्यंत गरिबीची असून ती कशी सुधारेल या विवंचनेंत ते सारखे असत व त्याबद्दल देवाची प्रार्थना करीत. हा वेळतावेतों त्यांस बाबांची कांहींच माहिती नव्हती. अशा स्थितींत नोव्हेंबर १९५१ मध्यें श्री. अंचन नांवाच्या त्यांच्या एका स्नेह्यानें त्यांस श्रीसाईबाबा-बद्दल माहिती सांगितली, तसेंच श्रीसाईचरित्र (इंग्लीशमधील) त्यांस वाचण्यास दिलें व सांगितलें, "तूं प्रत्यक्ष एकदां शिर्डीस जाऊन श्रीबाबांच्या समाधीन्चें व त्यांच्या मशिदीचें दर्शन घे म्हणजे सर्व ठीक होईल." श्रीसाईचरित्रांतील बाबांचा फोटो पाहून व त्यांच्या लीला ऐकून त्यांस शिर्डीस जाण्याची उत्कंठा लागली, परंतु पैसे नसल्यामुळें कसें जाणें होईल याबद्दल त्यांना चिंता वाटूं लागली.

त्याच दिवशीं संध्याकाळीं श्री. नारायणस्वामी या नांवाचे त्यांचे एक मित्र त्यांना भेटण्यास आले. या मित्रांनीं श्री. सुब्बाराव यांचेजवळ पैशांची कांहीं मदत मागितली. श्री. सुब्बाराव यांचेजवळ पैसे नव्हतेच तेव्हां ते कुठून मदत करणार? त्यांनीं त्यांस नकार दिला परंतु श्रीसाईबाबांबद्दल त्यांस नुकतीच जी माहिती मिळाली होती ती त्यांनीं श्री. नारायणस्वामींस सांगितली व म्हणाले, "अजूनही श्रीबाबा आपल्या भक्तांच्या कामना पूर्ण करतात तेव्हां तूं त्यांची भक्ति कर. मलाही त्यांचें दर्शन घेण्यास लवकरच जावयाचें आहे." त्यावर श्री. नारायणस्वामी म्हणाले "अरे, तूं आणि मी परम मित्र असतांना माझ्याशिवाय तूं एकटा कसा शिर्डीस जातोस?" असें म्हणून श्री. नारायण-स्वामी निघून गेले.

दुसरे दिवशीं अगदीं सकाळींच श्री. नारायणस्वामी हे सुब्बाराव यांचे घरीं हंसत हंसत आले व एकदम म्हणाले कीं, 'मित्रा, पैशांची काळजी करूं नकोस. चल माझ्या-बरोबर शिर्डीस.' हें ऐकतांच श्री. सुब्बाराव यांस परम आश्चर्य वाटलें. काल जो गृहस्थ पैशाची मदत मिळावी म्हणून याचना करण्याकरितां घरीं आला होता तोच आज आपणांस स्वतःच पैसे खर्चून शिर्डीस नेण्यास तयार आहे हें पाहून श्री. सुब्बाराव यांनीं

या गोष्टीचा उलगडा करण्यास सांगतांच नारायणस्वामी म्हणाले, 'अरे! ही एक मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. तूं काल संध्याकाळीं पैसे न दिल्यामुळें मी चिंतेंतच घरीं जाण्यास निघालों. एकीकडे 'श्रीसाईबाबा' 'श्रीसाईबाबा' या नांवाचा जप चाललाच होता. इतक्यांत इंपिरियल सिनेमा लागला व तेथें गर्दी फार होती म्हणून मी ती कमी होईपर्यंत १।२ मिनिटें थांबलों. नंतर चालू लागलों तोंच पायांस कांहींतरी अडखळल्या सारखें वाटलें म्हणून खालीं वांकून पाहिलें तों एक कागदाचें बंडल दिसलें. तें उचलून घेतलें तर माझ्या आश्चर्यास सीमा राहिली नाहीं. कारण तें कागदाचें बंडल नसून नोटांचें बंडल होतें व त्यांत १०।१० च्या ८ नोटा व २ रु. ची एक नोट असे ८२ रुपये होते. ते हे पहा!!'

ते पैसे पाहतांच श्री. सुब्बाराव यांना श्रीसाईबाबांच्या अतर्क्य लीलेची साक्षात् ओळख पटली व त्यांचेवर फार दृढ श्रद्धा बसली. नंतर ५।६ दिवसांनीं ते दोघे मित्र शिर्डीस बाबांचे दर्शनास आले व आतां श्री. सुब्बाराव तर अधुनमधून सारखेच शिर्डीस जात असतात.

केवढी ही श्रीसाईप्रभावाची प्रचीति! श्रीसाईबाबांनीं जें म्हटलें आहे कीं "मी माझ्या भक्तांना माझेकडे खेंचून आणीन" ते अजूनही खरेंच आहे हें या अनुभवावरून कळून येईल.

× × ×

## बाबांनीं संकटमुक्त केलें

ह्याच सुमारास श्री. सुब्बाराव यांना श्रीसाईप्रभावाचा दुसरा एक अनुभव आला.

ह्या गृहस्थांना श्री. सदाशिव सी. शेट्टी या इसमाचें १०० रु. देणें होतें. तें गरिबीमुळें त्यांना लवकर फेडतां आलें नाहीं. श्री. सुब्बाराव हे शिर्डीस प्रथमच येण्यापूर्वी श्री. शेट्टी यांनीं त्यांजकडे पुन्हा पैशाची मागणी केली तेव्हां शिर्डीहून परत आल्यावर मी पैसे देईन असें श्री. सुब्बाराव यांनीं सांगितलें. त्याप्रमाणें ते शिर्डीहून परत आल्यावर श्री. शेट्टी यांनीं पुन्हां पैशांची मागणी केली. पण त्यांचेजवळ पैसेच नव्हते तर ते कुठून देणार? त्यांनीं पुन्हां सबुरीची गोष्ट काढतांच श्री. शेट्टी यांनीं त्यांना खूप धमक्या दिल्या व २ दिवसांत जर पैसे मिळाले नाहींत तर याचा परिणाम ठीक होणार नाहीं असें बजावलें.

आतां मात्र श्री. सुब्बाराव खरोखरच घाबरून गेले. कारण हा मनुष्य जो बोलला तें केल्याशिवाय राहाणार नाहीं याबद्दल त्यांची खात्री होती. त्यांनीं आपल्या शेठकडे व इतर मित्रांकडे पैसे मागितले।पण कोणींहि मदत केली नाहीं. शेवटीं रात्रीं ९-३० चे सुमारास ते श्री. ए. एस. कोजरेकर या नांवाच्या आपल्या एका मित्राकडे गेले. हा मनुष्य जरा सधन असून आपली नड भागवील असें श्री. सुब्बाराव यांस वाटलें. तेव्हां त्यांनीं श्री. कोजरेकर यांजकडे उसने म्हणून रु. १०० मागितले पण त्यानें पैसे देण्यास स्पष्ट नकार दिला. पुष्कळ विनवून पाहिलें पण उपयोग झाला नाहीं. शेवटीं श्री.

सुब्बाराव कोजरेकरांस म्हणाले, 'मी आतां जातों. पण पुन्हां एकदां शेवटची विनंती करण्याकरतां उद्यां सकाळीं येईन.'

असें म्हणून ते घरीं गेले व श्रीसाईबाबांच्या फोटोसमोर बसून प्रार्थना करूं लागले कीं, 'बाबा, श्री. कोजरेकर यांना मला मदत करण्याची बुद्धी द्या.' सुमारें तासभर प्रार्थना केल्यावर ११॥ चे सुमारास ते झोपीं गेले. नंतर त्यांस एक स्वप्न पडलें. स्वप्नांत त्यांनीं श्रीसाईबाबांस प्रत्यक्ष पाहिलें. समाधी मंदिरांत जसा श्रीबाबांचा फोटो आहे तसेंच ते एका दगडावर डाव्या पायांच्या मांडीवर उजवा पाय ठेवून बसलेले दिसले. नंतर श्रीबाबांनीं हात वर करून श्री. सुब्बाराव यांस आपलेकडे बोलाविलें व आपल्या पायांवर खुणेनें डोकें ठेवण्यास सांगितलें. त्याप्रमाणें जवळ जातांच श्रीसाईबाबांनीं डाव्या मांडीवर ठेवलेला आपला उजवा पाय उचलला व दोन्ही पाय जुळवून ठेवले. त्याबरोबर श्री. सुब्बाराव यांनीं श्रीसाईबाबांचें पायांवर डोकें ठेऊन नमस्कार केला. तोंच ते स्वप्नांतून जागे झाले.

हें शुभ स्वप्न पाहतांच श्री. सुब्बाराव यांस अत्यंत आनंद होऊन आतां आपलें काम बरोबर होईल असा त्यांस दृढ विश्वास उत्पन्न झाला. त्याप्रमाणें खरोखरच ते पुन्हां श्री. कोजरेकर यांजकडे जातांच कोजरेकर आपण होऊन म्हणाले, 'किती पैसे पाहिजेत ते बोल ?' आपल्या मित्रांतील हा फरक पाहतांच श्री. सुब्बाराव यांस श्रीसाईलीलेचें मोठें कौतुक वाटून अत्यंत आनंद झाला. नंतर त्यांस १०० रुपये मिळून त्यांनीं श्री. शेट्टी यांचें कर्ज फेडलें.

ही आपली अत्यंत बिकट अडचण श्रीसाईबाबांच्या आशीर्वादामुळेंच निभावली गेली व श्रीबाबांवर आपल्या संकटांचा भार टाकून त्यांची भक्तिपूर्वक प्रार्थना केल्यास ते आपल्या भक्तांच्या संकटांचा सहज चुराडा करतात असें श्री. सुब्बाराव यांस मनःपूर्वक वाटतें.

× × ×

**'हेच का ते फकीर ?'**

श्रीमती सौ. सुरजबाई कासलीवाल जैन (वय ४२) राहाणार खामगांव, वऱ्हाड यांनीं आपण जैन धर्मीय असूनहि व श्रीसाईबाबांची कांहींच माहिती नसतांना आपण श्रीबाबांचे भजनी कसें लागलों हें खालील अनुभवांत सांगितलें आहे.

'३ फेब्रुआरी १९५१ ची गोष्ट. माझे यजमान त्यावेळेला उदेपूरला होते. ते आजारी झाल्याचें पत्र आलें. त्यांना गॅस्ट्रिक अल्सरचा बरेच वर्षांपासूनचा त्रास होता व त्यामुळें तब्येत एखादेवेळेस जास्त होत असे. म्हणून ते आजारी झाल्याचें पत्र येतांच मला फार काळजी लागली. तों त्या रात्रीं मला एक स्वप्न पडलें. त्यांत मी माझ्या पतीस लोकांनीं तिरडीवरून नेतांना पाहिलें. मी मागें मागें जात ओरडत होतें. तेथेंच माझे मानलेले भाऊ उभे होते. त्यांना मी म्हणालें, "दादा, मैं ऐसी नही रहुंगी (मी विधवा

राहणार नाहीं )." इतक्यांत एका ओट्यावर एक फकीर उभा असलेला दिसला. फकीर तेजःपुंज असून त्याचे डोक्यास फडकें बांधलेलें होतें व अंगांत पायघोळ कफनी होती. त्यास पाहतांच मी एकदम ओरडलें, 'मैं ऐसी नही रहुंगी.' तेव्हां तो फकीर म्हणाला, "बेटी रोती क्यों ? ये देखो, तेरा पति वापस आ रहा है.' असें बोलल्यावर मी तिरडी-कडे पाहतें तो माझे पति हालचाल करून खालीं उतरून माझेकडे येत आहेत असें दिसलें. मग मी स्वप्नांतून जागी झालें.

'दुसरे दिवशींच मी माझे पतीस तार पाठवून खुशाली मागविली. त्यांनी तारेनें खुशाल असल्याचें कळविलें तेव्हां माझा जीव भांड्यांत पडला. मग जे २।३ दिवसांनीं त्यांचें पत्र आलें त्यांत तारीख ३ रोजींच त्यांची प्रकृति जरा जास्त झाल्याचें व नंतर दुसरे दिवसापासून लगेच उतार पडल्याचें कळविलें होतें.

'आतां हे फकीर कोण ह्याची मला चुटपुट लागून राहिली. आम्ही दिगंबर जैन धर्मीय असल्यामुळें आमच्यांत फकीर वगैरे कांहीं नाहीं. फक्त जैन साधूंची आम्हांस ओळख. त्यांत आमच्यांत पडदा पद्धत म्हणून हा फकीर कोण हें लक्षांत येईना. इतक्यांत माझे मानलेले भाऊ श्री. गर्गे हे माझे घरीं आले. ह्यांची आमची ३ पिढ्यांची ओळख असून त्यांना आम्हीं घरांतलेच समजतों. त्यांना मी ही सर्व हकिकत सांगितली. तेव्हां त्यांनीं खोदखोदून मला त्या फकिराबद्दलच्या सर्व खाणाखुणा विचारल्या. शेवटीं त्यांनीं आपल्याजवळील एक फोटो दाखवून मला विचारलें, 'हेच ते फकिरबाबा कीं जे तुला स्वप्नांत दिसले ?' तो फोटो पाहतांच मला ओळख पटून मी होय म्हणून म्हटलें. तेव्हां ते म्हणाले, 'हे तर शिर्डीचे श्रीसाईबाबा ! आणि ज्या अवधींत तुला हें स्वप्न दिसलें त्याच सुमारास मी श्रीक्षेत्र शिर्डी येथें पहिल्यानेंच गेलों होतों व येतांना प्रसाद म्हणून हा फोटो आणला आहे.'

"तेव्हांपासून मला श्रीसाईबाबांची माहिती झाली व मी त्यांच्या भजनीं लागलें. माझे नातेवाईक याबद्दल मला नांवें ठेवून 'भ्रष्ट' म्हणतात पण मला त्याबद्दल वाईट वाटत नाहीं. नंतर मी शिर्डीस २ महिन्यांनीं श्रीबाबांचे दर्शनास आलें तेव्हां श्रीद्वारका-माईचें दर्शन घेतांच ज्या ओट्यावर स्वप्नांत मला ते फकीर ( श्रीसाईबाबा ) उभे असलेले दिसले तोच ओटा येथेंही दिसला. शिर्डीस येऊन श्रीबाबांचें दर्शन घेतल्यावर आमची सांपत्तिक स्थिति सुधारली व आतां आमचा धंदा भरभराटीस लागला आहे. तेव्हांपासून माझे यजमानांच्या पोटाची तक्रारही अद्याप तरी उमळली नाहीं."

× × ×

## बाबांचा सूचक दृष्टांत

श्रीसाईबाबांच्या ठिकाणीं सर्व धर्म अंतर्भूत असल्यामुळें भक्तांनीं त्यांना "सकल-मताचार्य" ही पदवी अर्पण केली आहे. वरील बाईनीं आपला जो दुसरा अनुभव खालीं दिला आहे, त्यावरून भक्तांनीं आपणांस दिलेली ही पदवी कशी योग्य आहे हें श्रीसाईबाबांनीं दृष्टांतद्वारें पटवून दिल्याचें दिसून येईल.

"मागच्या सूर्यग्रहणाची गोष्ट. त्यावेळेस मी शिर्डीस होतें. एके रात्रीं मला स्वप्न पडलें. त्यांत मी एक मोठा हॉल पाहिला व तेथें पुष्कळ जोडपीं श्रीसाईबाबांच्या भोंवतीं ( हे फकिरी वेषांत होते ) रिंगण घालीत नाचत गात फिरत होतीं. गाणें दुसरें तिसरें कांहीं नसून साईबाबा, साईनाथा बोले जा हेंच होतें. व ह्याच गाण्याच्या तालावर तीं जोडपीं नाचत होतीं. रिंगणाचीं एक फेरी पूर्ण झाली म्हणजे एकएक जोडपें हॉलच्या बाहेर पडत असे.

"थोड्या वेळानें मी जागीं झालें. विचार करतां श्रीसाईबाबांनीं आपणांस ह्या दृष्टांत द्वारें "साईबाबा, साईनाथ" हा मंत्र जपण्यास सांगितलें आहे. असें वाटलें. म्हणून दुसरें तिसरें कांहीं न करतां मी रोज तो मंत्र एकसारखा म्हणण्यास सुरवात केली. ह्यामुळें आमच्या देवांच्या उपासनेंत खंड पडला म्हणूनच कीं काय लगेच ४ दिवसांनीं श्रीसाई-बाबांनीं पुन्हां स्वप्नांत एक दुसरा दृष्टांत दिला. स्वप्नांत एक मोठा दरबार दिसला. तेथें कांहीं भव्य आसनें होतीं. त्यांतील एकावर श्रीसाईबाबा, दुसऱ्यावर श्रीशांतिनाथ भगवान, तिसऱ्यावर श्रीपद्मप्रभुभगवान व चवथ्यावर श्रीमहावीर भगवान बसलेले दिसले. मी श्रीबाबांना स्वप्नांत कांहींतरी प्रश्न विचारला त्यावेळीं ते म्हणाले, 'ये देख तेरे शांतिनाथ भगवान, उनकूं पुंछ !' ये देख तेरे पद्मप्रभुभगवान उनकूं पुछ, ये देख तेरे महावीर भगवान, उनकूं पुछ !' व मग मी स्वप्नांतून जागीं झालें.

'विचारांतीं गेल्या ४ दिवसांत जो आमच्या देवांच्या उपासनेंत माझेकडून खंड पडला; त्यामुळेंच श्रीबाबांना अशा तऱ्हेचा सूचनात्मक दृष्टांत देऊन बाबांच्या उपासनें-बरोबरच आमच्या धर्मांतील इतर दैवतांचीहि नित्य उपासना करीत जावी असा आदेश मला दिला. ही गोष्ट माझे लक्षांत आली आणि या दृष्टांतावरून बाबांची उपासना अगर जैनधर्मांतील दैवतांची उपासना ह्यांत फरक नाहीं असें मला वाटलें. त्या दिवसांपासून मी श्रीसाईबाबांच्या उपासनेबरोबरच आमच्या धर्मांतील दैवतांचीहि उपासना करीत असते.'

---

॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

**महिला वस्तु भांडार**

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें

लोकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधानांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

*** आमचीं कोठेंही शाखा नाहीं. ***

# दुःखावर विजय कसा मिळवाल ?

**दुःख कोणाला हवें असतें ? परंतु तें कधीं ना कधीं वाट्याला आल्याशिवाय मात्र रहात नाहीं. मग काय रडत बसायचें ? मुळींच नाहीं. दुःखाचा आपल्या जीवनांत सदुपयोग कशा रीतीनें करून घ्यावा; हें या लेखांत वाचा व त्याचें जरूर मनन करा.**

आपली सर्वांची अशी समजूत आहे कीं पूर्वप्रारब्ध कर्मानुसार सुख किंवा दुःख आपल्या वाट्यास येत असतें. आणि ती समजूत कांहीं खोटी आहे असें म्हणतां येणार नाहीं; परंतु तत्त्वज्ञानी महापुरुषांचें याबाबतींत असें म्हणणें आहे कीं, हें मानवी जीवन सुखदुःख भोगण्यासाठीं नाहीं तर आम्हीं दोन्हीं गोष्टींचा आमच्या जीवनांत सदुपयोग करून घ्यावा; यासाठीं आहे. जें जीवन केवळ भोगासाठीं असतें तें पशुपक्षांचें व कीडमुंगीचें जीवन होय. पशुपक्षांमध्यें बरें कोणतें, वाईट कोणतें याचा विचार करण्याची शक्ति मुळींच नसते. तें सामर्थ्य ईश्वरानें मानवालाच दिलें आहे. सुखदुःखासंबंधीं बुद्धिपूर्वक मानव विचार करूं शकतो. आपणाला सुखसंपदा ईश्वरानें दिली आहे ना ? तिचा सदुपयोग केवळ स्वतःसाठींच नाहीं तर इतरेजनांसाठींही करावयाचा; त्याच्या सहाय्यानें इतरांचें जीवन सुखी व समृद्ध करावयाचें हाच देवदत्त सुखसंपदेचा जास्तींत जास्त सदुपयोग होय. आणि मग वाट्याला जें दुःख आलें असेल त्याचा कसा काय सदुपयोग करावयाचा ? दुःख भोगणें म्हणजे एक प्रकारचें तपाचरण होय. 'आमुचा पेला दुःखाचा ! डोळे मिटुनी प्यायचा.' देवाला वाटलें, याच्या वाट्याला दुःख घालावें; म्हणून दुःख वाट्याला आलें. ती देवाची मर्जी समजून आपण कुरकूर न करतां तें दुःख निमूटपणें, मूकवृत्तीनें सोसावयाचें; सोशीत रहावयाचें तेंही विनातक्रार ! वाट्यास आलेल्या दुःखाचा हा सदुपयोग होय.

जो मनुष्य स्वतः दुःखी असून त्याचा जाळ, त्याचा संताप इतरांवर काढून दुसऱ्यांस दुःख देतो तो नवे नवे अपराध करीत असतो. त्याच्या दुःखांत उत्तरोत्तर अधिकाधिक दुःखाची भर पडत जाते. आणि जो स्वतः सुखी असून इतरेजनांच्या सुखासाठीं मनोभावें झटतो, त्याचें सुख वाढत जातें. आपणास अधिकाधिक सुख मिळावें याची तरतूद तो अशा रीतीनें करीत असतो.

## दुःखाचें कारण

या जगांत आपल्या वाट्याला जीं नाना प्रकारचीं दुःखें येतात त्यांचें कारण आपल्यांतील कांहींना कांहीं दोष होत. मनुष्य अज्ञानामुळें लोभ, मोह, अहंकार,

काम, क्रोध वगैरे शत्रूंच्या तावडींत सांपडतो! त्यांच्यातलें मनुष्याला अनेक दोष चिकटतात. त्या दोषांची यादी कुठवर सांगावी? त्या दोषांमुळें सहाजिकच मनुष्य दुःखाच्या तावडींत अचानक सांपडतो. आपल्या वाट्याला आलेलें दुःख कमी व्हावें अशी इच्छा बाळगणाऱ्यानीं आपल्यांतील नाना दोष काढून टाकण्यासाठी प्रथम झटलें पाहिजे. हे जे दोष माणसाला चिकटलेले असतात; त्यांच्या तावडींतुन त्यानें सुटका करून घेतली म्हणजे दुःखाचा जोर आपोआप कमी होत जाईल. शरिरांत रोगोद्भव झाला असतां आपण त्याचें मुलभूत कारण शोधूं लागतों. त्याचप्रमाणें दुःख वाट्याला आलें असतांच त्याचें मूलभूत कारण आपण शोधून काढलें पाहिजे.

वाट्याला आलेलें दुःख दूर व्हावें असें वाटतें ना? मग कोणत्या दोषांमुळें तें निर्माण झालें याचा शोध घेऊन ते दोष नाहींसे करण्याच्या उद्योगास लागलें पाहिजे. त्याशिवाय दुःखाचा परिहार होणार नाहीं.

आपल्या वांट्यास आलेलें दुःख आपण निमूटपणें सोसावयाचें. त्यांत वीरता आहे. परंतु त्याचा वचपा आपण दुसऱ्या कोणावरहि काढतां कामा नये. दुःखांतून आपणांस सद्गतीचा मार्ग मोकळा होत असतो. स्वर्गसुखाला जाण्याची ती वाट आहे.

**दुःखामुळें फायदा**

दुःख वांट्यास आलें तर संसाराबद्दल मनांत विरक्ती उत्पन्न व्हावी व लक्ष प्रभू रामचंद्राकडे अधिकाधिक लागावें. त्याची शरणांगति स्वीकारावी. शरणांगतीचा मार्ग असा आहे कीं, त्यामुळें मनुष्य आपोआप दुःखापासून आपली सुटका करून घेऊं शकतो. दुःखानें पोळलेला, होरपळलेला मनुष्य ईश्वराकडे पाहूं लागतो. दुःखाचा हा मोठ्यांत मोठा लाभ आहे. त्यांतूनच त्यागाची भावना निर्माण होऊं लागते. त्याग ही दैवी भावना आहे.

त्यागाच्या बळावर मनुष्य आपल्यांतील दोषांचा त्याग करूं लागतो. आणि दोष जाऊं लागले म्हणजे आपण परमात्म्याच्या कृपेला पात्र होऊं शकतों. दुःख हें जीवनाचा विकास करणारें आहे. विचारपूर्वक आपण त्याचा उपयोग मात्र केला पाहिजे. तेव्हां वाट्यास दुःख आलें असतां घाबरून जाण्याचें कांहीं एक कारण नाहीं. त्याच्याशीं धैर्यानें सामना देण्यास आपण बद्धपरिकर झालें पाहिजे. ईश्वराची कृपा संपादन करण्याचें तें एक प्रभावी साधन आहे.

या जगांतील लहान थोर सर्व दुःखांचा उद्भव मानवांत असलेल्या कमी अधिक दोषांमुळें, दुर्गुणांमुळें होत असतो. हे दोष घालविण्याचा राजमार्ग संतांनीं दाखवून दिलेला आहे. कोणता तो राजमार्ग? (१) इंद्रियांवर ताबा मिळविणें. प्रयत्नें करून मिळविणें. (२) इतरेजनांची निष्काम सेवा करण्यासाठीं मनोभावें झटणें व दुसऱ्यांच्या सुखांत भर घालणें, (३) आणि भगवंताचें सदासर्वकाळ अंतःकरणपूर्वक चिंतन. या तिहेरी मार्गांचा आपण स्वीकार करावा आणि दुःखापासून सुटका करून घ्यावी.

# संतसमागम गोड

## ‘देवांचा’ विकल्प दूर झाला

तुकाराममहाराजांच्यावेळीं, देहूपासून जवळच चिंचवड येथें चिंतामणि देव या नांवाचे एक गणपति उपासक होते. त्यांनीं तुकारामबुवांची कीर्ति ऐकून, त्यांच्या सामर्थ्याची प्रतीति पहावी या उद्देशानें त्यांना बोलावून आणण्यासाठीं एक मनुष्य देहूस पाठविला. चिंतामणी देव आपल्या भेटीची इच्छा करीत आहेत हें तुकोबांस अगोदरच अंतर्ज्ञानानें समजलें व ते भजन करीत देहुहून चिंचवडास जाण्यास निघाले, तों अर्ध्या वाटेंत देवांचा मनुष्य त्यांना भेटला व त्यानें त्यांचा निरोप तुकोबांस कळविला. तुकोबा म्हणाले, ‘मी तिकडेच जाण्यास निघालों आहे.’ कांहीं वेळानें बुवा चिंचवडास येऊन दाखल झाले.

### मनांत विकल्प आला

चिंतामणी देव घरांत स्नानसंध्येंत गुंतले होते. तुकोबा बाहेर आले आहेत हें त्यांस समजलें नाहीं. गणतीची मानसपूजा करून देव बाहेर येऊन पाहतात तों तुकोबा दारांत उभे ! देवांस पाहतांच तुकोबांनीं त्यांना सांष्टांग नमस्कार घातला. पण देवांच्या मनांत असा विकल्प आला कीं, तुकोबा शूद्र, आपण ब्राह्मण; तेव्हां त्यांना आपण नमस्कार कसा करावा ? मग ते तुकोबांस म्हणाले, ‘ तुमची गांठ पडली, आनंद झाला. देवांचा असा विचार होता कीं, तुकोबा बरोबर पांडुरंग, जेवतो वगैरे गोष्टी आपण ऐकतों. त्यांची कांहीं सत्यता जर आपल्या अनुभवास आली तर आपण त्यांना नमस्कार करूं.

पुढें देवांच्या घरांत जेवणाची तयारी झाली तेव्हां देवांनीं तुकोबासाठींही एक पान मांडण्यांस सांगितलें. ब्राह्मणांच्या पंक्तीपासून चार हातांवर बुवांचें पान वाढण्यांत आलें.

‘ आणखी दोन पानें वाढा, ’ असें तुकोबानीं देवांस सांगितलें व त्याप्रमाणें दोन पानें वाढण्यांत आलीं.

नंतर देवांनीं ‘ तुकोबांस बिचारलें, ‘ तुकोबा, हीं दोन पानें कोणासाठीं ? ’

बुवा म्हणाले, ‘एक माझ्या पांडुरंगासाठीं आणि दुसरें, तुमची उपास्य देवता जी गणपति त्याच्यासाठीं. तर आतां आपण गणपतीचें आव्हान करून त्याला बोलवा.

देव म्हणाले, ‘तुकोबा, असें कोठें झालें आहे ? मंत्र म्हणून नैवेद्य दाखविला म्हणजे तो गजाननास पोचतों. प्रत्यक्ष गजानन येथें कसा येईल ? ’

### साक्षात्कार नाहीं तर उपासना कसली ?

तुकोबा म्हणाले, ‘साक्षात् गणपति येथें येऊन जेवल्याशिवाय माझं समाधान होणार नाहीं. देवतेचा साक्षात्कार जर होत नसेल तर तिची उपासना व्यर्थ आहे.’

देव म्हणाले, 'आम्ही जर पुष्कळ वर्षांपासून गणपतीची उपासना करीत आहों; पण साक्षात् गणपति आमच्या घरीं येऊन कधींच जेवला नाहीं व आमचें तेवढें सामर्थ्यही नाहीं. पण साक्षात् पंढरीनाथ तुमच्याबरोबर येऊन जेवतो आणि तुमच्याशीं बोलतो चालतो असें लोक सांगतात. हें जर खरें असेल तर तुम्हींच गणपतीला पाचारण करून येथें आणा.'

बुवा म्हणाले, 'ठीक आहे. आपल्या कृपेनें मी गजाननास येथें आणतों.' इतकें बोलून त्यांनी गणपतीची मनोमय पूजा करून त्याला पाचारण केलें. त्याबरोबर गजानन सगुणरुपानें त्या ठिकाणीं प्रगट होऊन पात्रावर बसले. आपली आराध्यमूर्ति सगुणरुपानें प्रत्यक्ष आपल्या घरीं येऊन जेवावयास बसली आहे हें पाहतांच देवांस परमावधीचा आनंद झाला. त्यांनीं मंगलमूर्तीस प्रेमपूर्वक साष्टांग नमस्कार घातला.

मग ते तुकोबांस म्हणाले, 'आतां पांडुरंगास बोलवा.' तुकोबांनीं क्षणभर पांडुरंग मूर्तीचें स्मरण केलें, त्याबरोबर ती श्यामसुंदर चतुर्भुज मूर्ति तेथें प्रगट होऊन पाटावर जाऊन बसली. देवांनीं त्या मूर्तीलाही वंदन केलें. भोजन झाल्यावर तुकोबांनीं दोन्हीं मूर्तीस विडे दिले. नंतर तुकोबा आणि चिंतामणीदेव यांचा निरोप घेऊन पांडुरंग आणि गणपति अंतर्धान पावले. तुकोबांचें हें विलक्षण सामर्थ्य पाहून देवांच्या मनांतला विकल्प दूर झाला आणि त्यांनीं मोठ्या भक्तिभावानें बुवांस साष्टांग नमस्कार घातला.

**अहंकार गळाला**

रामेश्वरभट्टांस दिलेल्या शापाचें मोचन तुकोबांनीं केलें हें वर्तमान पुण्यांत **अनगडशहास** कळतांच तो म्हणाला, 'रामेश्वरभट्टास मी शाप दिलेला असतां, तो मला शरण न येतां तुकोबाकडे गेला आणि त्यानें त्याच्या अंगाचा दाह शांत केला. तर असा हा तुकोबा आहे तरी कोण आणि त्याचें सामर्थ्य तरी काय आहे, हें एकदां पाहिलें पाहिजे.' असा विचार करून तो देहूस जाण्यास निघाला. वाटेंत त्याला चिंचवड गांव लागला. तेथें गणपति भक्त चिंतामणी देव यांच्या घरीं जाऊन फकीरानें भिक्षा मागितली. 'आपल्या हातांत जो कटोरा आहे तो धान्यानें भरून मिळाला पाहिजे.' असें तो म्हणाला. देवांच्या कारभाऱ्यानें त्याच्या कटोऱ्यांत भिक्षा घातली. पण कितीहि धान्य टाकिलें तरी तो कटोरा भरेना !

कारभाऱ्यानें ती गोष्ट चिंतामणिदेवास कळविली. तेव्हां ते म्हणाले, "घरांत असेल तेवढें धान्य कटोऱ्यांत घाला; पण अतिथीस विन्मुख दवडूं नका."

शेवटीं घरांतलीं धान्यांची पेवें खोललीं तरी फकीराचा कटोरा भरेना. तेव्हां चिंतामणीदेवांनीं मूर्तिमंत सिद्धि निर्माण केली व तिच्या हातून कटोऱ्यांत धान्य टाकविलें तेव्हां तो कटोरा भरला !

**आवली कडाडली**

मग अनगडशहा तेथून देहूस गेला आणि तुकोबांच्या घरीं जाऊन आवलीस म्हणाला, "माई, माझा हा कटोरा पिठानें भरून द्या."

आवली स्वयंपाकांत गुंतली होती; तिनें जेव्हां फकीराचे हे शब्द ऐकले तेव्हां ती कडाडली, "कोण ग मेला आला आहे बाहेर ! घटिंगण मेले, या मेल्यानीं अगदीं डोकें उठाविलें !' आवलीची अशी गर्जना चालली आहे तों तिची धाकटी मुलगी गंगू ही चिमूटभर पीठ घेऊन फकीरास देण्यास निघाली. तें पाहून आवली तिच्या हातास झोंबली. त्या झोंबाझोंबींत त्यांतलें कांहीं पीठ जमिनीवर सांडलें. उरलेलें थोडेसें पीठ गंगूनें फकीराच्या कटोऱ्यांत नेऊन घातलें. तों तेवढ्यांतच पिठानें त्याचा कटोरा तोंडोतोंड भरून निघाला ! अनगडशहाला मोठें आश्चर्य वाटलें.

मग तो मुलीस विचारतो, तुकोबा हें तुझेंच नांव काय ? हे ऐकून गंगूस हंसूं आलें. ती म्हणाली, 'असें वेड्यासारखें भलतेंच काय विचारतोस ? तुकोबा हें पुरुषाचें नांव आहे, मुलीचें नाहीं. माझ्या वडीलांचें नांव तुकोबा; ते सकाळींच स्नान करून देवळांत जावून बसले आहेत.'

गंगूच्या चिमटींतलें सामर्थ्य पाहून तुकोबांच्या सामर्थ्याची कल्पना अनगडशहास चांगलीच झाली. त्याच्या अभिमानास मोठाच धक्का बसला !

पुढें तो देवळाकडे गेला व त्यानें बाहेरूनच तुकोबांस निरखून पाहिलें. त्यावरून त्याची खात्री झाली कीं, हा महासाधू आहे खरा. मग त्यानें निरभिमानानें बुवांस साष्टांग नमस्कार घातला व तेथें दोन दिवस मुक्काम करून तुकोबांचें कीर्तन त्यानें ऐकलें. दोन्ही दिवस कीर्तनांत तो बसला नाहीं, सारखा उभा राहून कीर्तन ऐकत होता. तिसरें दिवशीं बुवांचा निरोप घेऊन तो पुण्यास गेला.

## कलंडलेली भिंत पडायची थांबली

लोहगांवांत सतत महिनाभर तुकाराम महाराजांच्या कीर्तनाची झुंबड माजून राहिली होती. लोहगांवावर त्यावेळीं भक्ति प्रेमरसाचा जणूं काय लोंढाच आला होता. बुवांच्या कीर्तनाचें सर्वांना नुसतें वेड लागून राहिलें. रोज अन्नसंतर्पणही मोठ्या प्रमाणांत होत होतें.

तेथेंच राहणारी एक वृद्ध ब्राह्मण स्त्री तुकोबांकडे येऊन त्यांस म्हणाली, 'महाराज माझ्या घरीं तुम्ही एकदां जेवावयास यावें अशी माझी फार इच्छा आहे.'

तुकोबा म्हणाले, 'ठीक आहे; तुम्हीं जेवणाची तयारी करून कोणत्या दिवशीं यावयाचें तें मला कळवा.'

मग त्या ब्राह्मण स्त्रीनें मोलमजुरी करून थोडेसे पैसे मिळविले, आणि दहाजणांना पुरेल इतकी भोजनाची सामग्री विकत आणली. भोजनाचा दिवस नक्की ठरवून त्याप्रमाणें ती तुकोबास कळविणार तों मध्येंच एक विघ्न उपस्थित झालें. पाऊस फार पडल्यामुळें बाईच्या खोपटाची भिंत पडण्याच्या बेतांत आली. तेव्हां तिनें तुकोबांपाशीं जाऊन ही गोष्ट त्यांस कळविली.

तुकोबांनीं तिला सांगितलें, तुम्हीं बिलकूल काळजी करूं नका. आम्हीं जेवल्याशिवाय भिंत पडत नाहीं.' आणि शेवटीं तसेंच झालें. भिंतीचा आधार सुद्धा ती

कलंडली असतांहि तुकोबाचें जेवण होईपर्यंत ती पडली नाहीं. पुढें चार दिवसांनीं बाईनें भोजनाची सिद्धता करून बुवांस जेवणाचें आमंत्रण दिलें. बुवांबरोबर कांहीं ब्राह्मणांसहि तिनें जेवणास बोलावलं होतं. त्याप्रमाणें सर्वांचें भोजन झाल्यावर बुवा त्या वृद्ध स्त्रीस म्हणाले, 'तुम्हीहि आतां लवकर जेवून घ्या.' बाईचें जेवण झाल्यावर बुवांनीं तिच्या खोपटांतील सर्व सामान बाहेर काढविलें व तिलाहि बाहेर पडण्यास सांगितलें. इतकें झाल्यावर बुवा व इतर मंडळी जाण्यास निघाली तोंच झोंपडीची भिंत कोसळून खालीं पडली! मग गांवकऱ्यांस सांगून बुवांनीं त्या बाईस एक दुसरें घर देवविलें व रात्रौ त्या घरांत कीर्तन केलें.

'संत जाती ज्यांचे घरीं । त्याचीं विघ्नें पळतीं दुरी ।
सुदर्शन घेऊनि श्रीहरि । नाना परी रक्षितसे ॥'

— महिपति

---

# वर्गणीदारांस विनंती

श्री साईलीला मासिकाच्या वर्गणीदारांपैकीं ज्यांचा वर्षारंभ एप्रिलपासून होतो त्यांनीं आपली वर्गणी कृपा करून शक्य तेवढी लौकर खालील पत्त्यावर पाठवावी. यापुढील एप्रीलचा अंक नेहमींप्रमाणें '**श्रीरामनवमी खास अंक**' म्हणून प्रसिद्ध होणार असून तो श्रीरामनवमीच्या आनंदोत्सव प्रसंगीं वाचकांच्या हातीं पडेल. श्री साईलीलेचे दरवर्षी तीन खास अंक प्रसिद्ध होत असतात. (१) श्रीरामनवमी, (२) विजयादशमी व (३) गुरुपौर्णिमा हेच ते खास व विशेष अंक होत. वार्षिक टपालखर्चासह अवघ्या पांच रुपये वर्गणींत या तीन खास अंकांसह श्रीसाईबाबांच्या सेवेस वाहिलेलें व आपणांस भक्तिभावपर व धार्मिक आणि अध्यात्मिक दृष्टया मार्गदर्शक होऊन रहाणारें मासिक वर्षभर वक्तशीरपणें आपल्या भेटीस येत असतें. तरी कृपा करून आपली वर्गणी आपण लौकर पाठवावी व शिवाय आपल्या कल्याणासाठीं व सर्वांगीण विकासासाठीं सुयोग्य असें साहित्य आपणास पुरविणाऱ्या या मासिकास कमीत कमी दोन तरी वर्गणीदार मिळवून देऊन आमच्या या सेवाभावाच्या कार्यांत आपणही सहकारी व्हावें अशी कळकळीची विनंती आहे

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

वर्गणी पाठविण्याचा व पत्रव्यवहाराचा पत्ता } —**श्रीसाईलीला** कार्यालय; साई निकेतन
व्हिन्सेंट रोड, खोदादाद सर्कलजवळ,
प्लॉट नं. ८०४/बी, दादर, मुंबई १४

# श्रीसाईसच्चरित – गद्यानुवाद

ले० : एक साईभक्त



## अध्याय आठवा

(पुढें चालू)

बाबांची सर्वांठिकाणीं सारखीच समता असे. मी आणि हें माझें अशी वृत्ति त्यांची केव्हांही नव्हती. ‘सर्वांभूतीं भगवंत’ अशी त्यांची दृष्टी असून सर्व प्राणीमात्रांविषयीं त्यांच्या हृदयांत नेहमींच सदयता वावरत असे. सुख झालें म्हणून आनंद नाहीं आणि दुःखाबद्दल केव्हांही शोक करावयाचा नाहीं. राव आणि रंक दोन्हीही त्यांना सारखेच अशी त्यांची मनःस्थिति असे. हें त्यांच्याबद्दलचें कौतुक सामान्य झालें का ? दृष्टीकटाक्षानें क्षणांत शंकाचा राव करणारे बाबा हातांत चौपदरी घेऊन दारोदारीं भिक्षेसाठीं हिंडत असत.

धन्य ! धन्य ते जन कीं ज्यांच्या दारीं बाबा भिक्षेकरी होऊन ‘पोरी चतकु भाकरी आण गे’ असें म्हणून भिक्षेसाठीं हात पसरीत असत. एका हातांत टमरेल आणि दुसऱ्या हातांत झोळी घेऊन स्वतः प्रत्येक दिवशीं दारोदारीं भिक्षेसाठीं फिरत असत. भाजी, सांभारें, दुध, ताक वगैरे पातळ पदार्थ लोकांनीं टमरेलांत ओतावेत आणि भात, भाकरी वगैरे झोळींत टाकावें. पदार्था पदार्थांची चव तरी घेण्याची इच्छा कधीं झाली आहे का ? जिव्हेला रसासक्ति मुळींच माहीत नव्हती. यदृच्छेनें जें झोळींत पडलें असेल त्यावरच संतुष्ट असावें. तें रुचकर आहे कीं बेचव आहे याची कधींच चौकशी नाहीं. प्रहर दिवसा दररोज भिक्षा मागून आणावी व त्यानें उदरपूर्ति करून समाधानीं असावें अशी त्यांची वागणूक असे. भिक्षेस जाणें तरी नियमित असें का ? लहर येईल तेव्हां ते भिक्षा मागावयास जात. केव्हां केव्हां तर एका दिवसांत बारा वेळ भिक्षा मागण्यासाठीं गांवांत जात. अशारीतीनें जें अन्न मिळत असे तें मशीदींतील एका कुंडींत ठेवावयाचें. कावळे कुत्रें त्यांतूनच खात पण त्यांना त्यांनीं कधीं हांकलून दिलें नाहीं. मशीद आणि अंगण झाडणारी बाई देखील त्यांतून दहाबारा भाकरी घेऊन जावयाची; परंतु तिलादेखील त्यांनीं केव्हां हटकलें नाहीं. जेथें कुत्र्यामांजराना हडहड करणें त्यांच्या जिवावर येत असे ते गरीब दुबळ्यांना कधीं नाहीं म्हणणार कां ! धन्य त्यांचें जिणें !

आरंभीं वेडा फकीर तुकडे मागून पोट भरतो असे लोक बाबांना ओळखीत असत तेथें कसला त्यांचा बडीवार ! वेडा फकीर खरा ! परंतु तो हातानें सढळ असून निरपेक्ष

आणि प्रेमळ होता. बाहेरून जरी चंचल दिसत असला तरी अंतरीं अचल असून त्याची कळा आकलन होत नसे. अशा त्या कुग्रामांत जात्याच जी दयावंत व भाग्यवंत मंडळी होतीं तीं त्यांना महंत म्हणून मानीत असत. तात्या कोत्यांची आई बायजाबाई डोक्यावर भाकऱ्यांची टोपली घेऊन दुपारची रानांत जाई. कोसकोस बाबांना धुंडीत रानांतील झाडें झुडपें तिनें तुडवावींत, त्यांना हुडकून काढावें आणि त्यांच्या पायां पडावें. तिच्या सत्वाची थोरवी किती! ओली कोरडी भाकरी असेल ती रानावनांत दुपारींतिपारीं बाबांना तिनें भरवावी. ही तिची सेवा बाबा कधींच विसरूं शकले नाहींत. अगदीं स्मरणपूर्वक त्यांनीं तिच्या मुलाचें कल्याण केलें. त्या उभयतांचा फकीरावर दृढ भाव होता. देवच होता तो त्या दोघांचा. भाव तेथें देव नाहीं का! फकीरानें ध्यानस्थ बसावें. बायजाबाईनें पान मांडून त्यावर टोपल्यांतील अन्न वाढावें आणि बळेंच त्याला तें खाऊं घालावें. बाबांनीं नेहमीं म्हणावें, "फकीरी अव्वल बादशाही, फकीरी चिरंतन राही आणि अमिरी क्षणभर राही."

असो; पुढें बाबांनीं रान सोडलें. गांवांत येऊन नंतर मशिदींत राहूं लागले. तेथेंच अन्नग्रहण करूं लागले, आईचे कष्ट चुकविले. बायजाबाई आणि तिच्या नवऱ्यानीं हा नेम चालविला होता तो त्यांच्या मागून तात्यानेंही पुढें तसाच चालू ठेविला. धन्य! धन्य! ते संत! की ज्यांच्या हृदयांत नेहमींच वासुदेव वसत असे आणि धन्य त्या भक्तांचें भाग्य कीं त्यांना अशा संताचा सहवास उपभोगावयास मिळत होता.

तात्या महाभाग्यवान आणि म्हाळसापती ही मोठे पुण्यवान; म्हणूनच त्या दोघांना बाबांचा सहवास सतत प्राप्त होत होता. तात्या आणि म्हाळसापती दोघेही बाबांच्याबरोबर मशीदींत झोपत असत आणि त्यांचेंही या दोघांवर उत्कट प्रेम असे. झोपतांना पूर्व पश्चिम आणि उत्तर या दिशांना तिघांची डोकीं असत. आणि मध्यबिंदूस एकमेकांचे पाय एकमेकांस जुळलेले असते. अशातऱ्हेनें पथाऱ्या पसरून त्यांनीं गोष्टी कराव्यात; आणि एकास डुलकी येतांच दुसऱ्यानें त्याला जागवावें. तात्या घोरूं लागतांच अवचित बाबांनीं उठावें, त्याला उलथापालथा करून त्याचें डोकें दाबावें. बरोबर म्हाळसापतीला घ्यावें आणि त्या दोघांनीं मिळून तात्याला बिलगावें, मग त्याला आवळून त्याचे पाय दाबावेत आणि त्याची पाठही रगडावी. अशा रीतीनें चवदा वर्षें तात्या बाबासमावेत मशीदींत निजत असत. मोठे भाग्याचे दिवस होते ते अखंड राहीले त्यांच्या स्मरणांत. आईबापांना घरीं सोडून बाबांच्या आवडीसाठ तात्यांनीं मशीदींत झोपावें. या प्रेमाचें मोजमाप कसें करणार ? आणि या कृपेचें मोल कोणी करूं शकणार आहे का ? पुढें तात्याचे वडील निजधामास गेले आणि तात्या घरसंसारांत पडले. त्यांचें लग्नही झालें मग ते आपल्या घरींच निजूं लागले. अशी निष्ठा असेल त्यांनाच साईंचा खरा अनुभव. अशाच भक्तांना त्यांची नवलाई कळते.

तसेंच राहत्याचें नगरशेट खुशालचंद हे बाबांचे श्रीमंत भक्त होते. जसे गणपत कोते तसेच खुशालचंदाचे चुलते बाबांचे अतिशय आवडते होते. जातीनें जरी मारवाडी

होते तरी बाबांच्या ठिकाणीं त्यांची फार प्रिती होती आणि वारंवार ते एकमेकांना भेटत असत. जगराहटीला अनुसरून कांहीं काळानें मोठे शेटजी पंचत्वास पावले तरी पण बाबा विसरले नाहींत. आणि पहिले प्रेम अधिकच दुणावलें. पुढें खुशालचंदावरचे बाबांचें प्रेम सारखें वाढत गेलें आणि अहर्निश त्यांच्या कल्याणाविषयीं ते जागरूक राहूं लागले. कधींकधीं टांग्यांत बसून बाबा दीड मैलांवर असलेल्या राहत्यास मोठ्या आवडीनें त्यांच्याकडे जात असत. ताशेवाजंत्री घेऊन गांवचे लोक त्यांना सामोरे येत आणि त्यांना वेशीवर भेटून मोठ्या भक्तीनें लोटांगणें घालीत. मग मोठ्या आनंदानें आणि प्रेमानें वाजत गाजत समारंभानें ते बाबांना गांवांत घेऊन जात. खुशालचंद मग त्यांना आपल्या घरीं घेऊन जाई. तेथेंच अल्पोपहार झाल्यावर बाबांना तो सुखासनीं बैसवी. जुन्या जुन्या आठवणी काढून मोठ्या प्रेमानें त्यांच्या गप्पागोष्टी चालत असत. अशातऱ्हेनें आनंदानें कांहीं वेळ तेथें राहून फलाहार झाल्यावर बाबा शिरडीस परत येत असत.

एका टोकाला राहतें, दुसऱ्या बाजूला निमगांव आणि मध्यें शिरडी, परंतु या दोन गांवांच्या बाहेर बाबा केव्हांच कोठें गेले नाहींत. आगगाडीचें दर्शनहि त्यांनीं कधीं घेतलें नाहीं; परंतु गाडीच्या प्रमाण वेळा त्यांना अचूक माहित असत. भक्तांनीं गाडीची वेळ साधण्यासाठीं तयारी करून बाबांची आज्ञा मागण्यास जावें, पण बाबांनीं म्हणावें 'अरे! इतकी उतावीळ कशाला?' भक्तांनीं सांगावें, 'बाबा, घाई केली नाहीं तर माझी मुंबईची गाडी चुकेल आणि माझ्या नोकरीवर गदा येऊन साहेब मला नोकरीवरून कमी करील.'

बाबांनीं दम भरावा 'साहेब येथें दुसरा कोणी नाहीं. कशाला इतकी घाई करतोस! भाकर तुकडा खाऊन, जेवून सवरून दुपारीं जा.'

कोणाची प्राज्ञा होती कीं, त्यांची अवज्ञा करावयाची? लहान थोरांना, शहाण्या सुज्ञांना सर्वांना बाबांचा अनुभव होता. ज्यांनीं ज्यांनीं म्हणून त्यांचें ऐकलें त्यांची गाडी केव्हांच चुकली नाहीं; परंतु ज्यांनीं त्यांचा अवमान केला त्यांना त्याची प्रचिती चांगलीच मिळाली. एकापेक्षां एक असे अनेक अनुभव मी आपणांस संक्षेपानें कथन करीन.

हेमाड साईचरणीं शरण असून पुढील अध्यायीं भक्त गांवास परत जातांना बाबांची आज्ञा त्यांना कशी लागे याचें निरूपण तो करील. आज्ञा मिळे तो जाई. ज्याला आज्ञा नाहीं तो राही; परंतु जो आज्ञा अवमानी तो संकटीं कसा पडे, याचें कथन पुढील अध्यायांत करूं या. तसेंच माधुकरी वृत्ती धारण करून पंचभूतादि पापक्षालनार्थ साई भिक्षान्न सेवन कां करीत हेंही कथानिरूपण पुढील अध्यायीं ऐका. म्हणून श्रोतेही प्रत्येक क्षणाला आपल्या चरणापाशीं अशी आग्रहपूर्वक विनंति करतों कीं, आपल्या हितासाठीं श्रीसाईचरित्राचें श्रवण करा. अशारीतीनें श्रीसंतजनांनी प्रेरित केलेला आणि हेमाडपंतांनीं रचलेल्या श्रीसाईसमर्थ सच्चरिताचा "साईसमर्थावतरणं" नामें आठवा अध्याय संपूर्ण झाला.

॥ श्रीसद्गुरुसाईनाथार्पणस्तु ॥ शुभं भवतु ॥ ७६




## जानेवारी–फेब्रुवारी १९६१

**या** महिन्यांत साईदर्शनासाठीं बाहेगांवचे भक्तांची गर्दी नेहमीप्रमाणें बरीच होती. कांहीं कलावंतांनीं श्रीपुढें हजेरी दिली, त्यांची नांवें खालीलप्रमाणें—

**कीर्तनः**—श्री. ह. भ. प. उद्धव नारायण जोशी, मु. औंध. जि. सातारा, श्री. ह. भ. प. सदाशिव केशव दशनूरकर मनमाड; श्री. ह. भ. प. शंकर व्यंकटेश रूपलग श्रीक्षेत्र पंढरपूर; श्रीमती कृष्णाबाई येवलेकर मु. सातारा; श्री. ह. भ. प. बाबुराव तांबोळकर श्रीक्षेत्र पंढरपूर व संस्थान गवई श्री. मराठे.

**गायनः**—श्री. बाबूराव झाळत्रे इंदूरकर, श्री. पंढरीनाथ बुवा पुणेकर, पुणें ( तबला ), श्री. दादा प्रभाकर दाणेकर अमरावती, श्री. दिगंबर रामभाऊ काशिकर अमरावती, श्री. गुलाबबाई काळे, श्री. कुसुमबाई जाधव, श्री. इंदूबाई काळे, मु. अहमदनगर, श्री. शकुंतला माळी, श्री. अनुसया माळी, श्री. शांता माळी, श्री. माणिक भगत माळी, मु. शिरवळ, जि. सातारा.

**कव्वालीगायन**—श्री. अहमद मुनीम कव्वाल जामदार ( राजस्थान ), श्री. रंगनाथ जाधव मुंबई, श्री. शनिकुमार शेलार, डोंबिवली, मुंबई.

**भजन**—श्री. एकनाथ पाटील बुवा बोरकर खुर्द भजनी मंडळ औरंगाबाद, श्री. हेमचंद्र रामचंद्र आयेर बडोदा, श्री. दामोदर गोविंद दंडवते बडोदा,

**प्रजासत्ताक दिनाचा सोहळा**—ता. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त श्रीसाई संस्थान मंदिर कळसानजिक गच्चीवर मे. रिसिव्हरसाहेब ( श्रीसाईसंस्थान शिर्डी ) यांचे अध्यक्षतेखालीं सकाळीं ९ वाजतां ध्वजवंदन समारंभ सर्व साईसंस्थान नोकर सेवेकरी इंग्रजी मराठी शाळेंतील मुलेंमुली, सर्व शिक्षक मंडळी, गांवांतील पुढारी व प्रतिष्ठीत मंडळी यांचेसह आनंदांत पार पडला, रात्रौ श्रीसाईमंदिर कळस द्वारकामाई चावडी, गुरुपादुका यांच्यावर विजेच्या रंगीबेरंगी दिव्यांची रोषणाई केली होती. यादिवशीं महाराजा ग्वालियर यांचे देणगीतून सर्व साई संस्थान नोकर सेवेकरी गांवांतील पुढारी, सर्व शिक्षक मंडळी प्रतिष्ठीत मंडळी यांना पंक्वान्नाचें भोजन देण्यांत आलें. रात्रौ संस्थान गवई श्री. मराठे यांचें मंदिरांत कीर्तन व शाळेंतील मुलामुलींचें संवाद, नाट्यछटा गाणी नकला असा गोड कार्यक्रम रात्रौ २ वाजेपर्यंत झाला.

**थोरामोठ्यांच्या भेटी**:—शिरडी येथें श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठीं व पूजा अभिषेक वगैरेसाठीं निरनिराळ्या ठिकाणहून लहानथोर मंडळी नेहमींच येत असतात. गेल्या जानेवारी–फेब्रुवारींत दर्शनार्थ येऊन गेलेल्या कांहीं मंडळीची येथें नोंद घेण्यांत येत आहे.

पाटबंधारे व वीजखात्याचे मंत्री ना. एस्. बी. चौहाण यांचें जानेवारींत शिरडी येथें श्रीच्या दर्शनार्थ आगमन झालें होतें. त्यांनीं बाबांची पूजाअर्चा करून भक्तिभावपूर्वक त्यांना पुष्पहार अर्पण केला.

शेतकीखात्याचे उपमंत्री ना. मधुसूदन वैराळे यांनीं फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यांत शिरडीला भेट देऊन बाबांस विधीपूर्वक अभिषेक केला. शिरडी संस्थान कारभारासंबंधीं आस्थापूर्वक चौकशी करून एकंदर कारभार उत्तम प्रकारें चालू असल्याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें.

फायनॅन्स खात्याचे डेप्युटी सेक्रेटरी श्री. जोशी यांनीं गेल्या महिन्यांत शिरडीस भेट देऊन बाबांची पूजा, अर्चा, अभिषेक वगैरे यथासांग केला. न्यु इंडिया इन्शुअरन्स कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. बी. के. शहा यानीं सहकुटुंब शिरडीस फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यांत भेट देऊन तेथील व्यवस्थेबद्दल समाधान व्यक्त केलें व संस्थानला देणगीहि दिली. श्रीसाईबाबा यांस त्यांनीं पत्नीसह अभिषेक व पूजा अर्चा केली.

बीड येथील कलेक्टर साहेब श्री. सुंदर राजन् यानीं सहकुटुंब शिरडीस ता. ६ फेब्रुवारी रोजीं भेट देऊन बाबांस अभिषेक व त्यांची यथासांग पूजा अर्चा केली. तेथील एकंदर व्यवस्था पाहून त्यांनीं समाधान प्रगट केलें व या पुण्य क्षेत्रास व पवि स्थानास पुन्हां पुन्हां भेट देणें मला आवडेल असेंहि त्यांनीं उद्‌गार काढले.

**शिरडी येथें टेलिफोन एक्सचेंज**—शिरडी येथून मुंबई वगैरे ठिकाणीं टेलिफोन नसल्यामुळें पुष्कळांस तें गैरसोयीचें वाटत असतें; परंतु ही अडचण आतां लौकरच दूर होणार आहे हें लिहिण्यास आनंद वाटतो. ता. ८ फेब्रुवारी रोजीं अहमदनगर पोस्टल विभागाचे सुपरिंटेंडेंटसाहेब श्री. कामत हे सहकुटुंब शिरडी येथें आले होते. त्यांनीं बाबांची पूजाअर्चा व अभिषेक सत्यनारायण वगैरे भक्तिभावपूर्वक करून तेथील एकंदर कार्य कसें काय चालेल आहे याची माहिती करून घेऊन समाधान व्यक्त केलें. खुद्द शिरडी येथें टेलिफोन एक्सचेंजची सोय नसल्यामुळें गैरसोय जाणवते हें समजून येतांच ती सोय तेथें लौकरच करण्यासंबंधीं त्यांनीं आश्वासन दिलें. त्यासाठीं जरूर असलेली जागा योग्य ठिकाणीं देण्याचें आश्वासनही त्यांना शिरडी संस्थानतर्फे देण्यांत आलें आहे. श्री. कामत यांनीं या प्रश्नाकडे आस्थापूर्वक लक्ष पुरविल्यामुळें शिरडींत आतां टेलिफोन एक्सचेंजची लौकरच सोय होईल अशी आशा वाटते.

**शेतकी प्रदर्शनास देणगी**—सालाबादप्रमाणें कोपरगांव येथें भरणाऱ्या जिल्हा शेतकी प्रदर्शनास श्रीसाईबाबा शिरडी संस्थानतर्फे रु. २५१ ची देणगी देण्यांत आली असून प्रदर्शनाच्या पदाधिकाऱ्यांनीं याबद्दल आभार प्रदर्शक पत्र पाठविलें आहे.

शिरडी येथील हवामान सध्यां फार चांगलें आहे.

---

# शिरडीस जाणाऱ्या साईभक्तांस सूचना

१ शिरडीस पोहोचल्या नंतर चौकशी ऑफिसांत खोली बद्दल तपास करा.

२ खोलींत सामान ठेऊन कुलूप लावल्याशिवाय कोठेही बाहेर जाऊं नका.

३ सार्वजनीक हॉटेलमध्यें जागा मिळाली तर, तुमचें सामान चीजवस्तु संभाळण्याची काळजी घ्या. सामानाजवळ आपला एक माणूस बसवून मगच इतरत्र जा. चोर मार्गावर असतात.

४ स्नानगृहांतून बाहेर येतांना पैशाचें पाकीट दागिने, हातांतील घड्याळ, कपडे, भांडी वगैरे बरोबर घेण्यास विसरूं नका. अलिकडे लॉकर्सची सोय करण्यांत आली आहेच. तिचा जरूर फायदा घ्या.

५ अंगावर दागिने असल्यास आपल्या लहान मुलांना एकटे सोडूं नका.

६ श्रीचे आरतीचे वेळीं धक्काबुक्की होते. त्यावेळीं आपल्या मुलांना सांभाळा व आपला खिसा पाकिटावर लक्ष ठेवा.

७ श्रींचे ऑफिसशिवाय कोणत्याहि इतर ठिकणीं अगर कोणाच्या हातांत पैसे देऊं नका. धर्म कृत्य फक्त संस्थेमार्फत करावे.

८ श्रींचें ऑफिसांत धर्मकृत्याबद्दल पैसे दिले, तर त्याची पावती मागून घ्या.

९ श्रीसाईबाबा संस्थानचा, इतर ठिकाणीं श्रीसाईबाबांचे नांवावर चाललेल्या संस्थांशीं कांहींहि संबंध नाहीं.

१० श्रींचा कोणी शिष्य नाहीं, अगर वारसदार गादीवर बसलेला नाहीं. अगर मध्यस्ती नाहीं. नुसत्या श्रींच्या पेहेरावासारखे पेहराव केलेल्या, माणसावर विश्वास ठेवून फसू नका.

११ मार्गदर्शकाचें सोंग करून कांहीं अपरिचीत माणसें, शिरडीची स्थळें दाखविण्यासाठीं ओळख करून घेतात. अशा माणसांवर विश्वास ठेवूं नका.

१२ श्रींचे नांवावर कांहीं माणसें जंतर मंतर, धागादोरा करणारे मांत्रिक तांत्रिक म्हणून फिरत असतात. त्यांचेपासून सावध रहा.

१३ श्रींचे नांवावर चालू असलेल्या सांखळी पत्रास महत्त्व देऊं नका.

१४ श्रींचे बाबतींत आधारभूत माहिती, ऑफिसांत विचारावी, इतरांवर विश्वास ठेवूं नका.

१५ आपली कांहीं तक्रार असल्यास, मुद्दाम सोईसाठीं ठेवलेल्या नोंद पुस्तकांत, आपली तक्रार नोंदावी. आपलें पूर्ण नांव व पूर्ण पत्ता नोंदविण्यास विसरूं नका. शक्य झाल्यास तक्रारींची एक प्रत मुंबई कचेरीकडे पाठवावी.






ा पत्ता : 'ABHAY' Hyderabad. टेलिफोन नं. ४६३८

# हैद्राबाद सॅनेटोरियम

**खास क्षयरोग्यांसाठीं !**

हवेशीर आधुनिक सुखसोयींनीयुक्त अत्यंत माफक दर असलेलें व साईभक्तांनीं चालविलेलें एकमेव ठिकाण.

पुण्याहून रेल्वेनें फक्त बारा तासांचा प्रवास.

**गरीब साईभक्तांसाठीं खास सवलत**

विशेष माहितीकरितां खालील पत्त्यावर लिहा:—

**सुपरिंटेंडेंट हैद्राबाद सॅनेटोरियम,**
**रमतापूर, हैद्राबाद ३. [ आंध्र प्रदेश ]**




